# माणूस

शनिवार । १० ऑगस्ट १९७४

एक रुपया




# तूटीचा अनर्थ संकल्प (तोडणारा)







आमच्या आजच्या नाटकांत
रंग भरला नाही तर तक्रार
करू नये. रंग भलतेच्या-
सलते महागले आहेत !


पाईपच्या
किंमती कडाडल्या
आहेत तरीसुध्दा
एवढा पाईप
कसा परवडतो
रे ?

# साप्ताहिक माणूस

| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : चौदावे |
|---|---|---|---|
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | १० ऑगस्ट | अंक : अकरावा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७४ | किंमत : एक रुपया |


श्री. श्री. ग. माजगावकर यास–

स. न.

ता. १ ऑगस्टच्या आपल्या भ्रष्टाचार विरोधी मोर्च्यात, केसरीच्या गायकवाडवाड्यासमोर 'जयतराव टिळकाना फाशी द्या' अशी घोषणा झाली असा आरोप माझ्या कानावर आला. म्हणून मी चौकशी केली आणि घोषणा झाली नाही असे मला सागण्यात आले. तुम्ही स्वत: गायकवाडवाड्यासमोर 'लो. टिळक झिंदाबाद', 'लोकमान्याचा जयजयकार असो' अशा घोषणाखेरीज दुसरी घोषणा येथे देऊ नये असे निदर्शकाना सांगत असल्याचे मी स्वत पाहिले–ऐकले होते. आणि तरी अशी एखादी घोषणा झाली असल्याची शक्यता आहे. अशी घोषणा झाली असेल तर आपल्या मोर्चा–उपोषणासबधी 'केसरी'त आलेल्या वक्र वृत्तातावद्दल निषेध करण्याचा नैतिक अधिकार आपल्याला उरत नाही. म्हणून अशी घोषणा झाली असेल तर त्यावद्दल आपण खेद व्यक्त करू या.

या सदर्भात मला खात्रीपूर्वक समजलेली एक घटना मी जाहीर करू इच्छितो. दरवर्षी, ता. १ ऑगस्ट रोजी, टिळक पुण्यतिथी निमित्त, गायकवाडवाड्यात केसरी–मराठा ट्रस्टतर्फे निमत्रितासाठी चहापानाचा समारभ होत असतो. यदा आपले भ्रष्टाचार–विरोधी उपोषण होणार म्हणून चालकानी हा समारभ रद्द केला होता. तशा स्वरुपाचा त्यानी ठरावही केलेला आहे. हे एक प्रकारचे आपल्या आदोलनाचे स्वागत होते. अशा परिस्थितीत वर म्हटल्याप्रमाणे घोषणा झाली असेल तर ते विशेषच दुर्दैव म्हटले पाहिजे आणि त्याबद्दल आपण खेद व्यक्त केला पाहिजे असे मला वाटते. कळावे.

आपला,

३–८–१९७४ प्रभाकर पाध्ये

श्री. प्रभाकर पाध्ये यासी–

सादर नमस्कार

आपल्या वरील भावनेशी मी सहमत आहे. तुमचे पत्र आल्यावर मी दि. वि. गोखले, अनिल अवचट, यदुनाथ थत्ते या तीन व्यक्तीजवळ चौकशी केली. आणखीही एक दोघाना विचारले. यापैकी कुणालाही आपण आरोप म्हणून वर उद्धृत केलेली जयतरावांसबधीची घोषणा ऐकू आली नाही असे त्यांनी स्पष्टपणे मला सागितले. काहीतरी ऐकण्या–सांगण्यात घोटाळा झाला असण्याची शक्यता आहे. एकूण मोर्चा सजीव असूनही शाततापूर्ण होता याबद्दल कुणाचेही दुमत नाही. तरीही उत्साहाच्या भरात, अनवधानाने कुणाकडून एखाद दुसरी चुकीची घोषणा दिली गेली असल्यास, मोर्चा-उपोषण कार्यक्रमाचा एक निमंत्रक म्हणून तुमच्याप्रमाणे मलाही अवश्य खेद प्रकट करावासा वाटतो.

आपला,

श्री. ग. माजगावकर

ता. क. केसरीत दुसऱ्या दिवशी आलेल्या 'वक्र' वृत्तातावद्दल मात्र माझे मत वेगळे आहे.

श्री. ग. मा.

स. न.

दि. १ ऑगस्ट या दिवशी भ्रष्टाचार विरोधी आदोलन समितीच्या वतीने पुण्यात शनिवार वाड्यासमोर दिवसभर उपोषण, चर्चा हे कार्यक्रम झाल्यावर सायकाळी एक भव्य मोर्चा निघाला.

मोर्चाचे अग्रभागी मा. अण्णासाहेब सहस्रबुद्धे याचेसमवेत विविध क्षेत्रातील समर्थ, प्रतिष्ठित मडळी होती. मोर्चा नारायण पेठेतून केसरीवाड्याकडे येत होता. मी स्वत: केसरी वाड्याजवळ उभा होतो. मोर्चापुढे लाऊडस्पीकरवरून प्रचार करणारी रिक्षा केसरी कार्यालयाजवळ आली. केसरी कार्यालयाचा पहारेकरी दरवाजा वद करीत असलेला पहाताच मी त्याला विचारले, 'का रे वावा दरवाजा वद करतोस ! आज तर १ ऑगस्ट. लो. टिळक पुण्यतिथी. सारेजण त्याचे दर्शन घेत पुढे जातील.' त्यावर पहारेकरी म्हणाला, 'साहेब, मी एकटा आहे. येथे दुसरे कोणीही नाही.' त्यावर मी त्याला समजावून सागितले की, 'बाबा रे, हा तसा मोर्चा नाही.' त्याने मला दरवाजावर उभे रहाण्यास सांगितले आणि मी देखील ती जबाबदारी ओळखून तेथे उभा राहिलो. मोर्चा वाड्यासमोर आला. 'लो. टिळक महाराज की जय' असा निनाद पुकारला गेला. पुढची मंडळी आणि त्यानी केलेला जयजयकार ऐकताच त्या पहारेकऱ्याचीही खात्री झाली. त्यानेच माझ्या म्हणण्याची सत्यता पटल्याचे मान्य करून मला पुढे जाण्यास सागितले.

४–८–७४ भा. ग. रवड, पुणे

माननीय सपादक,

'माणूस'च्या शनिवार, २७ जुलैच्या अकातील श्री. पु. ल. देशपाड्यानी श्री. प्रभाकर पाध्याना लिहिलेले पत्र वाचले आणि मनात पुढील तरग उठले.

विनोदी लेखकाचे बोलणे केवळ 'परिहासविजल्पित' मानले न जाता 'परमार्थेन' घेतले जावे, अशी खरोखरच तळमळ असेल तर,

पृष्ठ ३१ वर

# एका संस्कृतीचा मृत्युलेख

आशय : वसंत लुले          शिल्प : रमेश गुप्ता

(इतिहासातीत काळी एका जगबुडीत
एक खंडच्या खंड गडप झाले होते असे म्हणतात.
नुकतेच सिंधी महासागरात तरंगणारे
एक काल–कवच
(टाइम कॅप्सूल) सापडले आहे.

प्रलयकाळी या खंडावरील
कुठल्यातरी थोर संस्कृतीच्या
बुद्धीजीवी व तंत्रकुशल वर्गातील
प्रतिनिधींनी ते तयार केले व भिरकावून दिले

त्यातील संकेतलिपीचा अर्थही
पुराण वस्तु शास्त्रज्ञानी आता उलगडला आहे.
त्या संस्कृतीचा हा एक प्रकारे
मृत्यूलेखच आहे )

' उद्याच्या दुनियेतील दोस्तानो,
तुमच्यासाठी या बुडत्या जगातील
पश्चातापदग्धाचा हा एक इशारा
आणि एक आवाहन :

आम्ही ' इंद्रलोक ' नामक
एका सहकारी तत्त्वावर फ्लॅट सिस्टिमने
बांधलेल्या नऊ मजली इमारतीच्या
सौधावर उभे आहोत.
आणि प्रलयाच्या महापुराची पातळी
आठव्या मजल्यापर्यंत येऊन ठेपली आहे.
आजूबाजूच्या तमाम इमारती
केव्हाच बुडाल्या आहेत.
फक्त दूरवरचा एक टॉवर
अजून माथे उचावून आहे.
आणि टेकडीवरील एक झाड.
त्यावर काही लोक लदबदलेले
दुरून ओळखता येत आहेत...

' इंद्रलोका 'तील बहुतेक निवासी
अजून तरी सौधावर सुखरूप आहेत.
पण सुटकेसाठी येऊ घातलेल्या
हेलिकॉप्टरची आशा
आता जवळजवळ आम्ही सोडली आहे !...

आम्ही, अरे आम्ही !...
आम्ही बुद्धीजीवी !
आम्ही कार्यालयातील मेंदू !

आम्ही चक्राना गती देणारे व ते जाम करू शकणारे हात !
आम्ही प्रतिभा नामक देवतेचे उपासक
व निर्मितीचे अग्रदूत, व उपयुक्ततेचे कारागीर.
आम्ही नियोजक व न्यायकर्ते आणि चिकित्सक.

आम्ही संघटक, संयोजक व संशोधक
अरेरे, गेले ! ते सर्व गेले !
आता आम्ही व ते सारेच सर्वहारा !

आणि तरीही
पृथ्वी गोलावरील काल्पनिक पण व्यवहारोपयोगी
अक्षवृत्ताप्रमाणे
या वर्तुळाकार सौधावर
आमच्या वर्गरेषा अजून ठळकपणे
शिल्लक आहेत.

ती पहा, ती सर्वोच्च गच्ची
या छताच्या शाळुंकेवर शिवलिंगाप्रमाणे
अथवा बेंबीतून उगवलेल्या कमळाप्रमाणे
दिसणारा तो अखेरचा मजला.
तेथे शेटजी असतात.
आमच्या संस्कृतीतील तो अखेरचा हुकमाचा एक्का.
दि लॉर्ड ऑफ मनी !
आणि तो त्या सर्वोच्च इमल्याच्या तळभागी
व या सौधाच्या मध्यभागी उभारलेल्या
आपल्या काचेच्या केबिनमध्ये आसनस्थ
अजून धीरोदात्त चेहऱ्याने स्थिर आहे
तो आमचा नेता.

त्याच्या भवतालच्या गराड्यात
दोन नंबरच्या नव श्रीमंताचा वर्ग आहे
त्याना व त्याच्या लबकेशी व गुबगुबीत
माजपुत्राना मरेपर्यंत तरी
कसलीच टचाई नाही.
(पण मरण फार जवळ येऊन ठेपले आहे )

आणि त्यानंतर आम्ही !
तसा आमचा एकच मध्यम वर्ग आहे.
पण त्यातही चार श्रेणी आहेत.

आणि ते त्या तिथे अगदी काठाशी
बेसुमार दाटीवाटीने जे आहेत
त्याना आमच्या संस्कृतीत
' जनता वर्ग ' असे म्हणण्याचा उदात्त प्रघात

आम्ही नुकताच पाडला होता.
पूर्वी त्याना ' नेटिव ' अथवा ' काला आदमी '
असे म्हणत, म्हणतात.

ते, आमचा ' इंद्रलोक ' बांधणारे
व अन्न वस्त्र पैदा करणारे आणि
इतर नित्योपयोगी वस्तु !
ओझी वाहणारे तसेच हरकामे व घरगडी.

आणि होय, संरक्षण व सुव्यवस्था
आम्ही अजून शिल्लक ठेवली आहे.

त्यासाठी या अखेरच्यात व आमच्यात
सशस्त्र रक्षकाचे एक पथक तैनात आहे.

तर असो ! आम्ही सारे आता
दिवगत व बेपत्ता झालेल्या ईश्वराचे
औरस, अनौरस, दत्तक पुत्र
आमच्या या वर्गीय विभाजनात
ऐक्याचा एकच दुवा होता
आणि तो म्हणजे 'पोट' नामक
आम्हा सर्वांचा मध्यवर्ती अवयव.

सदरहू पोट होते म्हणूनच आमच्या सस्कृतीत
प्रचंड हालचाल आणि हलचल होती.
आमचे समूह त्यासाठीच एका प्रातातून
दुसऱ्या प्रातात तसे एका देशातून दुसऱ्यात
जात येत होते.

याच केंद्रीय अवयवाच्या मागणीवरून
लाच, बैमानी व हरामखोरी
नामक अधारातील शिष्टाचार रूढ झाले होते.
याच महान अवयवाच्या हुकमाने
मदिराचे पंडे पुजारी देवाच्या अगावरील
खरे दागिने विकून खोटे चढवीत
व दैवताच्या मूर्ती चोरून परदेशात विकल्या जात.

या संस्कृतीतील सर्व क्रात्या
कोणत्याही ध्येयवादाच्या नावाने
झालेल्या असल्या
तरी त्या मूलभूतपणे पोटासाठीच झालेल्या होत्या.

या भरगच्च गजबजलेल्या सौधावर
जणू आमच्या सस्कृतीचा एक 'क्रॉस सेक्शन'
प्रयोग शाळेतील टेस्ट प्लेटवर ठेवल्यासारखा
नाट्यपूर्णपणे उमटलेला आहे.

पोटाच्या आकारमानाप्रमाणे ठरणारे
आमचे सामाजिक दर्जे
येथेही ठळकपणे उठून दिसत आहेत.

ज्याची पोटे मोठी व ज्याच्या भुका प्रचड
ते येथे शिरोभागी अस्ताव्यस्त व केंद्रस्थानी ऐसपैस आहेत.
आणि ज्याची पोटे टीचभर
आणि भुका ती खळगी भरण्या एवढया लहान
ते कडेवर, अखेरीस अवघडलेले
गुदमरलेले व गिचमिडलेले आहेत.
आणि चढणारे पाणी
प्रथम त्यांनाच गिळकृत करणार आहे !

आम्ही ! अरे आम्ही या दोन वेढयाच्या
दरम्यान दरोबस्त आहोत.
दररोज आपले रक्त गाळून जगणारे
हे अखेरचे व अधम
आणि ते रक्त पिऊन फुगलेले
हे अव्वल आणि उत्तम
याच्या मध्ये आहोत आम्ही विचारे मध्यम !

पण आम्ही सघटित आहोत आणि सावध.
आम्ही त्या उच्चस्थ पापाचे लाचार वाटेकरी
तसेच या भणग दु:खाचे व्यथित साक्षीदार.
त्याचे महाभोग पाहून
आमच्या मनातही लालसेची लाळ गळत असते.
आणि त्याची थुकी आम्ही प्रसादवत् झेलीत असतो.
त्याची चकचकीत पादत्राणे म्हणजे
आमची पावन दर्पणे !

पण त्याच वेळी या अधमाना पडणारे उपास
आम्हालाही मनाने भोगावे लागतात.
आणि वटवटू लागतो आम्ही तत्त्वज्ञाने
खरवडू लागतो तलमतरबेज कविता.
टपटपू लागतो कल्चर्ड आसवे.

आम्हास समजते की आम्हा मध्यमाच्या व उत्तमाच्या
स्थितिस्थापक पोटात शिरणारा प्रत्येक घास
हा त्यांच्या तोडातून हिसकावलेला आहे.
आणि आमच्या ताटात जेव्हा एक चपाती
जास्त पडते
तेव्हा ती चौघाच्या वाटयातले प्रत्येकी एकमेव चतकोर
बळकावून तयार झालेली असते.
आणि आमच्या माता जेव्हा आपल्या
मुलाना दोन कप दूध पाजतात
तेव्हा ते त्याच्या आयांच्या सुकलेल्या स्तनातून
शोषून घेतलेले असते.

हे कडेवरील कर्मदरिद्री
जेव्हा दुर्गंधयुक्त घाम गाळतात
तेव्हाच ते उच्चस्थ आणि केंद्रस्थ
व आम्ही मध्यस्थ
अत्तराचा घमघमाट करू शकतो

हे तारुण्यातही खप्पड व वाकलेले असतात
म्हणून ते म्हातारपणीही जवानीतले रगढग करू शकतात
आणि त्या दोहोच्यामध्ये
आम्ही ! ... अरे आम्ही !

आमच्या भ्याडपणास आम्ही
विवेक असे नाव दिले आहे
आणि आमच्या लाचारीस
आम्ही सस्तार म्हणून गौरवितो
आणि आमच्या ढोगास आम्ही
व्यवहारशास्त्राची महिमा आणली आहे...

प्रकृतीत न्याय नावाचे एक तत्त्व असते
हे आमची सस्कृती विसरूनच गेली होती.
तेव्हा विस्मृती व विकृतीच्या टोकाशी आम्हाला गाठीत
एक दिवस प्रेषिताच्या स्वप्नातील
तो प्रलय खरोखरीच आला.
सृष्टीची लयताल बधने कडकडा उध्वस्त करीत

अवर्षणामागून अवर्षणे
सकटामागून संकटे
रक्तपातामागे रक्तपात
टचाई मागून टचाई
सपामागून सप व बडामागून बडे
आणि युद्धोत्तर स्मशान शातताची मध्यतरे
मूल्याचे आत्मदहन
व श्रद्धांचे गर्भपात
आणि नीतितत्त्वाचे नग्न होऊन
भर रस्त्यावरून धावत सुटणे
राज्याची उलथापालथ
आणि राज्यकर्त्यांचे केशवपन

आणि समस्त स्वघोषित अवतारांचे पलायन !

या साऱ्या शोक नाट्यावर
अखेरचा पडदा पडावा तसा हा प्रलय आला.'
कसा हे आम्हास ठाऊक नाही.
पण तो भूगर्भातून, आजूबाजूने व आकाशातून
तसाच व्यक्तींच्या व समूहाच्या मना मनातून आला.

आणि गेली ! आमची सारी चतुर बांधकामे बुडाली.

पण अजूनही शेटजी

दि बिग बॉस !

आपल्या ऋद्धी सिद्धींसह
तेथे स्वत:स बंदिस्त करून
संभोगातील समाधीसुख भोगीत आहेत.
जग बुडणारच आहे.
आणि आता मंत्रीमंडळातील कोणताही थारेपालट
कोणताही नवा वाद व नवी घोषणा
आणि कुठल्याही योजनाचे आराखडे
ते वाचवू शकत नाहीत.
हे जेव्हा इंटरकॉमवरून नेत्याने त्यांना कळवले
तेव्हा ते तसेच पान चघळीत सुखेनैव
स्त्री देहाच्या कमलपत्रावर
मद्यमुक्तावस्थेत तरंगायमान झाले.
(त्यापूर्वी एकदा अखेरची क्षमा याचना
त्यांनी करून घेतली.)

प्रलयवर्षा केव्हाची थांबली आहे.
पण पाणी वेगाने चढत आहे.
दोन सांजा उलटल्या आहेत
आणि कडेवरच्या गर्दीची बुभुक्षा

अनावर होऊ लागली आहे.
त्यांच्या नजरा अन्नाची मूक मागणी
करू लागल्या आहेत.
त्याचे हात पसरले जात नाहीत
कारण त्यांच्यापैकी कोणीच भिकारी नाही.
पण त्यांच्या मुठी आवळल्या जात आहेत.
आणि मेंदूतील नसा धडधडू लागल्या आहेत.

त्यांच्या जरत्कारू पोराचे मंद चीत्कार
व त्याच्या हडकलेल्या आयाचे
त्यांना गप्प करण्यासाठी ओरडणे
त्रासदायक गोंगाटासारखे उठत आहे.

आणि मग शेणकिड्याचे थवेच्या थवे
खातेऱ्याच्या दिशेने बदबदत सरसावतात

तसा त्याचा वेढा अजाणताच
आमच्याकडे सरकू लागला आहे.

आम्ही हादरतो व माना खाली टाकतो.
कारण आमची भूतदया अनंत असली
तरी आमचे साठे मर्यादित आहेत.

आरक्षी दलानी आदेश मागितला आहे.
आम्ही तो नेत्यापर्यंत पोचवला आहे.
त्याने तो 'वर' धाडला आहे.
आणि तेथून अर्धवट बेफिकिरी
अर्धवट अवसान यानी धुदावलेल्या आवाजात
हुकूम सुटला आहे :
हटाव !

नेत्यांच्या केबिनमधून तो प्रतिक्षेपित होतो
हटाव ! हटाव !

आम्ही सारे जिवाच्या कसोशीने
टपटपू व खडखडू लागतो
हटाव ! हटाव !! हटाव !!!
ध्वनिक्षेपकातून सर्व आसमंत
दणाणून टाकले जाते.
हटाव हटाव हटाव हटाव हटाव हटाव...!

आणि मग ते रेटले जाऊ लागतात.
थव्याथव्यानी फुफाटत चढणाऱ्या
गढूळ लाटात हरवून जातात.
अर्धीअधिक गर्दी हटलेली असते
आणि तरी ती वखवखलेली पोटे
अजून आमच्याहून सत्येने
कितीतरी पट शिल्लक असतात.

पुन्हा घनघोर स्मशान शांतता :
एखाद्या थडग्यावर उभे असल्यासारखे आम्ही
आमच्या काळोखातील अस्वस्थ मिठ्या.
व आर्द्र चुंबने.

आणि मग एक सूर्यच्या सूर्य फुटल्यासारखा
लखलखाट
व कानठळ्या फोडून टाकणारा कडकडाट !

शुद्धीवर आल्यानंतर आम्हास दिसते की
ते सर्वोच्च भोगायतन
कोसळले आहे !
आणि ते सत्ताकेंद्र
भस्मसात झालेले आहे !

आमच्या उद्याच्या दोस्तानो !
आता आमची जगण्याची आशा संपलेली आहे.
व इच्छाही उरलेली नाही.
कारण जिव्हाळ्याचे जे काही होते
ते जळून, उन्मळून गेले आहे.
तेव्हा या गडप झालेल्या संस्कृतीचा
अखेरचा सलाम !

जेव्हा केव्हा या गडप झालेल्या
संस्कृतीचा शोध लावण्याचा प्रयत्न होईल

(आम्ही असे प्रयत्न करीत असू न्यावरून)
तेव्हा संशोधकाच्या सोयीसाठी
काही ओळखीच्या खुणा आम्ही
या कालकवचात नमूद करून ठेवीत आहोत.

दोस्तहो, आमच्या संस्कृतीचा मानदंड
असलेला पर्वत
जगात सर्वांत उंच होता.

आमच्या न्याय देवता आंधळ्या होत्या !
आमचा प्रत्येक नेता हा प्रथम अभिनेता होता.
आणि ज्याला किमान दोन तरी चेहरे नाहीत

असा एकही महापुरुष

आमच्याजवळ नव्हता !'

□ □

# हिंदी महासागरातील बड्या राष्ट्रांची स्पर्धा

वा. दा. रानडे

हिंदी महासागर शातता विभाग म्हणून जाहीर करण्यात यावा. बड्या राष्ट्रांनी तेथे आरमारी तळ स्थापू नयेत आणि नाविक हालचाली करू नयेत अशी आपली भूमिका भारताने अनेकवेळा स्पष्ट केली असली तरी बड्या राष्ट्राच्या हालचाली थोपविण्यास भारत असमर्थ ठरला आहे. सयुक्त राष्ट्र सघटनाही याबाबत काही करू शकली नाही. उलट तिच्या तज्ञानी तयार केलेल्या अहवालात बड्या राष्ट्राच्या दडपणाने दुरुस्ती करण्यात आली.

यूनोच्या सरक्षणतज्ञानी आपला पहिला अहवाल गेल्या ११ मेस प्रसिद्ध केला. डिगो गार्शिया तळाचा विस्तार करण्याची योजना अमेरिकेने अमलात आणली तर हिंदी महासागरात अमेरिका व रशिया याच्यात नवी आरमारी शस्त्रस्पर्धा सुरू होईल असा इशारा या अहवालात दिला होता. सोमालियात बेरबेटा येथे रशिया तळ उभारीत असल्याच्या बातम्या आहेत.

किनाऱ्याला लागून व आत असलेली तीस राष्ट्रे हिंदी महासागराच्या वर्चस्व क्षेत्रात येतात. बड्या राष्ट्राच्या या हालचाली त्याच्या हिताच्या नाहीत असे या अहवालात म्हटले होते. हिंदी महासागर शांतता विभाग करण्याची कल्पना प्रत्यक्षात कशी आणता येईल याचा विचार करण्यासाठी यूनोने पधरा राष्ट्राची समिती नेमली. तिने स्टॉकहोमच्या आतरराष्ट्रीय शातता सशोधक सस्थेचे डॉ. फ्रँक बार्नबी, भारतातील सरक्षण अभ्यास व विश्लेषण सस्थेचा सचालक के. सुब्रह्मण्यम आणि इराणच्या आरमारातील माजी अॅडमिरल शॅम्स सफवी या तज्ञाना अहवाल सादर करण्यास सागितले होते. अमेरिका या भागात क्षेपणास्त्रे आणि अणु पाणबुड्याचे तळ उभारीत आहे. रशियाचा प्रदेश त्यांच्या टप्प्याच्या माऱ्यात येऊ शकेल. डिगो गार्शिया येथील हवाई तळाची धावपट्टी वाढविण्याची अमेरिकेची योजना असून ती पुरी झाल्यावर बी ५२ ही अजस्त्र अमेरिकन विमाने तेथे ठेवता येतील असे या अहवालात म्हटले होते.

बड्या राष्ट्रांच्या दडपणाने दोन महिन्यांनी या अहवालात दुरुस्ती करण्यात आली. ही दुरुस्ती का करावी लागली याचे स्पष्टीकरण करताना यूनोचे सरचिटणीस डॉ. वॉल्डहाइम म्हणाले की तज्ञानी केवळ वस्तुस्थिती निदर्शक अहवाल सादर न करता आपली मते व्यक्त केली आहेत. तसेच 'बडी राष्ट्रे' म्हणजे सुरक्षा समितीची कायम सभासद असलेली पाच राष्ट्रे. हा यूनोचा अर्थ मान्य न करता त्या शब्दाचा निराळा अर्थ लावला आहे. म्हणून या दुरुस्त्या करण्यास त्याना मी सागितले आहे. डॉ. वॉल्डहाइम याचे हे स्पष्टीकरण पटणारे नाही. केवळ वस्तुस्थितीदर्शक माहितीचे सकलनच करायचे तर त्यासाठी तज्ञाची काय जरुरी होती ? सरचिटणिसाची कचेरी हे काम करू शकली असती. पण तज्ञानी आपली मते व्यक्त करावीत अशी यूनोच्या हिंदी महासागर समितीचे सभासदाचीच इच्छा होती. या समितीचे अध्यक्ष लकेचे प्रतिनिधी डॉ. अमरसिंगे यूनो बैठकीत म्हणाले होते, 'तज्ञाची मते आम्हाला हवीत. त्यांनी व्यक्त केलेल्या मताबद्दल सरचिटणिसाना आम्ही जबाबदार धरणार नाही. या मताना किती महत्त्व द्यावयाचे, त्याचा काय उपयोग करावयाचा हे यूनोची सर्वसाधारण समिती ठरवील.' 'बडी राष्ट्रे' या शब्दाचा तटस्थ राष्ट्राना अभिप्रेत असलेला अर्थ अमरसिंगे यानी ग्राह्य धरला. इतर अनेक सभासदांनीही असेच मत व्यक्त केले. ही सर्व पार्श्वभूमी लक्षात घेता तज्ञाच्या अहवालात दुरुस्ती करण्याची काहीही आवश्यकता नव्हती. पण बड्याच्या दडपणापुढे यूनो सरचिटणिसाना मान तुकवावी लागली असे दिसते.

हिंदी महासागरात बहरिन, अस्मारा, डिगो गार्शिया आणि कोकी बेटावर अमेरिकेचे तळ आहेत. ब्रिटनचे तळ सेचेल्स, मॉरिशस व गान येथे आहेत. जिबोती, दिगो स्वॉटेझ येथे फ्रान्सचे तळ आहेत. पाश्चात्य बड्या राष्ट्रांनी एवढे तळ उभारल्यानंतर रशियाही हिंदी महासागरात आपला प्रभाव वाढविण्याच्या दृष्टीने हालचाली करीत आहे. रशियाचे अध्यक्ष पॉडगोर्नी यांनी गेल्या महिन्यात सोमालियास दिलेली भेट महत्त्वाची समजली जाते. सोमालियाचे एथिओपिया, केनिया आणि फ्रेंच जिबती या देशाशी प्रादेशिक वाद आहेत. चाळीस लाख सोमाली लोकांपैकी एक तृतियांश या शेजारी देशांच्या सीमा भागात रहातात ब्रिटिश व इटालियन सोमालीलँड एकत्र येऊन सोमालिया हे स्वतत्र राष्ट्र १९६० साली अस्तित्त्वात आले. त्यानतर शेजारच्या राष्ट्राच्या सीमाभागातील सोमाली वस्तीचे प्रदेश मिळवून 'बृहत् सोमालिया' स्थापण्याच्या हालचाली सोमालियाने सुरू केल्या.

केनियाच्या उत्तर सीमेवर सहा वर्षे गनिमी युद्ध झाले. इथिओपियाच्या वादग्रस्त ओगाडेन भागात दहा वर्षांपूर्वी काही काळ युद्ध झाले व सीमा चकमकी अनेक वेळा झाल्या. सोमालियाने पाश्चात्य राष्ट्राकडे मदत मागितली पण फारसा प्रतिसाद न मिळाल्याने तो रशियाकडे वळला.

रशियाचे सरक्षणमत्री मार्शल ग्रेचको यानी सोमालियास १९७२ साली चार दिवसाची भेट दिली तेव्हापासून सोमालियास रशियन शस्त्र मदत वाढली आहे. रशियाने शेकडो रणगाडे, चिलखती गाड्या, मध्यम पल्ल्याची बॉबर विमाने, गनबोटी, आणि मिग फाइटर विमाने सोमालियास पुरविली आहेत. सात मिग २१ विमाने रशियाने नुकतीच पाठविली. सोमालियाजवळ आत २५ मिग फाइटर विमाने व काही इल्युशिन बॉबर विमाने आहेत. रशियाचे २५०० लष्करी सल्लागोर तेथे असल्याचा अमेरिकन गोटातील अदाज आहे.

सोमालियातील या रशियाच्या वाढत्या प्रयत्नाचा धोका एथिओपिया, केनिया या शेजारच्या राष्ट्राना वाटतो. केनियाजवळ अमेरिकेची स्ट्राइक मास्टर विमाने व ब्रिटनकडून नव्यानेच मिळविलेली हटर विमाने आहेत. इथिओपियात अमेरिकेचे शभर सल्लागार आहेत. त्याच्या हवाई दलात ४६ लढाऊ विमाने आहेत. पण त्यात अमेरिकेची जुनी झालेली स्टारफाइटर विमानेच जास्त

पृष्ठ २६ वर

# सोलकढी

## □ हॉटेलवाल्यांच्या तुपात माशी

माझे खापरपणजोबा आयुष्यात कधी हॉटेलात गेले नाहीत. माझ्या पणजोबानी आणि आजोबानी त्याचाच कित्ता गिरवला. माझ्या वडिलानी हॉटेलात जायचे निकराने टाळले आमच्या पूर्वजाच्या दृष्टीने हॉटेलात जाणे हे एकूण अनीतीचे कृत्य होते. शिवाय त्यामुळे प्रकृतीला अपाय पोचतो, असे मानले जायचे ते वेगळेच. अनीतीने प्रकृतीला अपाय पोचत असावा. त्यामुळे ज्याची प्रकृती बिघडलेली असते त्याची नीतीसुद्धा बिघडलेली असली पाहिजे, अशी माझी समजुत असते.आमच्या कुळात मी कुळबुडवा निघालो समजू लागल्यापासून मी हॉटेलात जाऊ लागलो. हॉटेलसारखे खाणे घरी मिळत नसे, घरच्यासारखे खाणे मिळणाऱ्या हॉटेलात मी कधीच पाऊल ठेवले नाही.

अलीकडे हॉटेलात खाणे हे घरी खाण्याइतके नेहमीचे झाले आहे. आणि या हॉटेलाची अतिथ्यशीलता अशी खानदानी असते की इच्छिलेले सारे मिळण्याची सोय ती करू शकतात. त्यामुळे हॉटेलावरून एखाद्या ठिकाणच्या मानवसमूहाच्या भौकिक (म्हणजे भूकसबधित) इच्छा काय आहेत, हे सागणे फारसे अवघड नसते. या इच्छा भागवणाऱ्या खानावळी माणसाला दवाखान्याइतक्याच आवश्यक झाल्या आहेत.

खानावळीचा आणि दवाखान्याचा सबध मानुषी आवश्यकतेपुरताच मर्यादित नाही, असे जाणकार मडळी सागतात. त्याच्या मते, सगळी हॉटेले कमीजास्त प्रमाणात अस्वच्छ असतात; पदार्थात वापरलेला कच्चा माल भुक्कडभेसळीचा, वाईटवोखटा, गोताबिल असतो; पदार्थाची अगची चव उग्र मसाल्यानी मारून टाकलेली असते . एकूण शहाण्या माणसाने इतर अनेक पायऱ्याप्रमाणे हॉटेलची पायरीसुद्धा चढू नये हे बरे. हॉटेलमध्ये पदार्थ म्हणून खाती मडळी चवीने रोगजतूच खातात, असे या जाणकारांना वाटते. अशा खाणेरड्या माणसाना मग रोगनिवारणकेंद्राकडे जावेच लागते. हुकमी पेशट्स मिळावे यासाठी काही चतुर डॉक्टरानी म्हणे स्वत.च खानावळी घातल्या आहेत !

हे जाणकार आपल्या सरकारला कुठे भेटले कुणास ठाऊक. कारण सरकारने नुकत्याच, अन्नधान्यभेसळप्रतिबधक कायद्यात काही दुरुस्त्या सुचवल्या आहेत. हॉटेलचे वा हलवायाकडचे पदार्थ खाल्ल्यामुळे विषबाधा झाल्याचे काही प्रकार निदर्शनास आले. बेपर्वा भेसळीमुळे हे झाले, असे सरकारच्यासुद्धा ध्यानात आले. भूकबळीप्रमाणे अन्नबळी पडू नयेत एवढ्यासाठी सरकारने हॉटेलवाले व हलवाई याना जरब बसवण्याचे ठरवले. भेसळ करण्याच्या गुन्ह्याला पूर्वी किरकोळ सजा व दड होत असे, या गुन्ह्याला जन्मठेपीची सजा असावी, अशी दुरुस्ती आता सरकारने सुचवलेली आहे. आपल्या सरकारने एखादी गोष्ट करायचे मनावर घेतले म्हणजे चपलेचा अगठा तुटला तरी ते माघार म्हणून घेत नाही, हेच यावरून सिद्ध होते.

सरकारने इतके मनावर घेतल्यामुळे हलवावाल्यांच्या आणि हॉटेलवाल्याच्या शुद्ध निर्भेळ व अस्सलसाजुक तुपात माशी पडली. प्रत्येकालाच जन्मठेपेची शिक्षा भेडसावू लागली. त्यातल्या, केळकर, चितळे, पणशीकर, तावे, चाफेकर, जोगळेकर इत्यादी आडनाववताना आपण प्रतिटिळक वा प्रतिसावरकर होऊ असे काही काळ वाटले तरी भयाचे काय करावे हा प्रश्न पडलाच. मग ती सगळी मडळी एकत्र झाली आणि तिने दडपशाही करणाऱ्या, जनताविरोधी व पाषाणहृदयी सरकारचा तीव्र निषेध केला. हॉटेल व हलवाई फेडरेशनचे सरचिटणीस एम्. एच्. व्यास यानी सागितले की भेसळयुक्त पदार्थामुळे मनुष्यहानी झाली तर त्या गुन्ह्यासाठी टप्प्याटप्प्याने वाढणारी पण कमाल तीन वर्षे मुदतीची सक्तमजुरी व दोन हजार रुपये दड एवढी शिक्षा असावी.

या प्रकारच्या सूचनावजा मागणीतून कोणते महाभारत उद्‌भवेल हे या व्यासमहर्षींना कळते असे दिसत नाही. शिक्षा कमी करावी असे आवाहन करण्याच्या भरात आरोप मान्य करून टाकला ना या महोदयानी. अशा भाऊरावाची छत्री भर पावसात उलटी होणे अटळ आहे.

मला स्वत ला जाणकाराचे, सरकारचे, आणि व्यासाचे मत मान्य नाही. हॉटेलातल्या खाद्यपदार्थांमुळे विषबाधा होऊ शकते, असे म्हणणे, हे आकाशवाणीवरील कार्यक्रमामुळे मनोरंजन होऊ शकते, असे म्हणण्यासारखे आहे. ज्याना भारतियत्त्वाची विषबाधा झाली आहे त्यांना हॉटेलातल्या य:कश्चित खाद्यपदार्थामुळे विषबाधा होण्याचा सभव आहे, ही गोष्ट कोणाला कशी हो पटेल ?

—अनंतराव

# मुंबई ( भ्रष्टाचार ) विद्यापीठ

२० जुलै माणूस अंकात पहिला स्फोट प्रसिद्ध झाला होता.

## स्फोट दुसरा : प्रतिनिधी

पहिल्या स्फोटानतर बराच धुराळा उडतो. राजस्थानचा अनुभव ताजा आहे. खुद्द राजस्थानात त्यामुळे वादळ झाले. कधी नव्हे असा धुंवाधार पाऊस कोसळला. स्फोटानतर असे घडणे क्रमप्राप्तच असावे. मुंबई विद्यापीठाच्या १८ तारखेच्या मिटींगमध्येही असेच एकाएकी वादळ उठल्याची ताजी बातमी आहे. त्यापूर्वी नुकताच 'माणूस'मधून पहिला स्फोट झाला होता. विद्यापीठातल्या भ्रष्टाचाराची आणखी काही अगे 'मनोहर', 'प्रभजन' आदी साप्ताहिकानी उघडी पाडली होती. विद्यापीठाच्या परीक्षा विभागात वर्षानुवर्ष कामे करणारे, कित्येकजण कपाळाला हात लावून बसले होते. अन्य कर्मचाऱ्यांनी त्याचे work to rule आदोलन, काही काळापुरते, स्थगित केलेले असले, तरी त्याचा दट्या मोठा आहे. विद्यार्थी, हळुहळू का होईना, पण एकूणच विद्यापीठ प्रकरणी जागा होत असल्याची चिन्हे आहेत. भ्रष्टाचार विरोधी आघाडी त्याला राबवायची असली तरी, स्वत चे काही प्रश्नही त्याला सोडवायचे आहेत. त्याचबरोबर विद्यापीठ कर्मचाऱ्याच्या मागण्या वास्तव असल्याने, त्याही तो उचलून धरीत आहे जयप्रकाशजीची मुबईतली सभा चागलीच यशस्वी झाली. त्या नतरची विद्यापीठ विद्यार्थी कर्मचारी आदीबरोबरची वेगळी बैठकही चागलीच रगली. ह्यातून कर्मचारी, विद्यार्थी, डॉ. वागळे, प्रा. रेगे आदीसारखी काही प्राध्यापक मडळी. ह्यानी उठवलेल्या आवाजाला निश्चितच धार चढली आहे. नेमक्या ह्याच वेळेला, वृत्तपत्रानीही विद्यापीठाचा प्रश्न उचलून धरलेला आहे. त्यामुळे साहाजिकच विद्यापीठाच्या बैठकी आधी, ह्या स्फोटामुळे वातावरण तापले होते

'...ही बैठक बोलावली होती चिदबरम् ह्यांनी. व्ही. सी. ना (कुलगुरु प्रा. टोपे) नेहमीप्रमाणे म्हणे आधी पत्ताच नव्हता. इतर सदस्याप्रमाणे त्यानाही जेव्हा पत्र मिळाले तेव्हा कळले बैठक आहे. पण बैठकीच्या वेळी बघतात तो, बहुसख्य ठराव बैठकीपूर्वीच पसार झालेले. (हेही नेहमीच घडते म्हणे अलीकडे!) प्रा. टोपे चिडले. 'माणूस' तिथे हजर होताच इतर भावंडासह. प्रा. टोप्याना परिस्थितीचा रेटा समजलेला भासत होता. कर्मचाऱ्याच्या मागण्या मान्य केल्या जाव्यात, विद्यापीठाच्या कारभाराविषयी होणाऱ्या आरोपांच्या संदर्भात चौकशी समिती नेमायला होकार दिला जावा, असा काहीसा व्यवहार्य सूर कुलगुरूनी धरला. पण रजिस्टारना हे मान्य नव्हते. 'I dont care a bit of this propoganda. I just dont bother about it' असे साफ धुडकावून लावून, व्ही. सी. ना साथ द्यायचे चिदबरम् साहेबानी नाकारले. दोघात जाम खडाजगी झाली. प्रा. टोपे बैठक अर्ध्यावरच सोडून निघून गेले. प्राध्यापक सदस्यांमध्ये साहाजिकच खळबळ माजली. प्रा. कोठारी धावतपळत कुलगुरूच्या मागे गेले, कसेबसे काम्प्रोमाईज झाले. ती बैठक रद्दबातल ठरवली गेली. आठवडयाने नवीन बैठक बोलवायचे ठरवले गेले. त्यात सर्व बाजूनी सारासार विचार करून निर्णय घ्यायचे ठरवले गेले. हे वादळ तात्पुरते शमले...' ह्या बैठकीच्या वेळी उपस्थित असलेल्या एका स्वीय सहायकाशी (P. A. शी) मी बोललो, आणि वरील माहिती सहजी मिळून गेली.

नतर विद्यापीठ परिसरात आणखीही फिरलो. अनेकाशी बोललो. काही 'आतल्या गोटातून' आलेल्या बातम्यानुसार टोपे-चिदबरम् ही रीफ्ट आता वाढतच जायची शक्यता आहे कारण आणखी काही अशी प्रकरणे चव्हाटयावर येऊ पाहात आहेत, की ज्यामुळे कुलगुरूविरुद्ध मोर्चे उभे राहाण्याची शक्यता आहे. त्यावेळी चिदबरम् नामानिराळे राहाण्याचीही शक्यता आहे. साहाजिकच व्ही. सी. त्यामुळे सध्यातरी भडकलेले आहेत. अशीच कथा आहे, रजिस्टारच्या इतर काही वरिष्ठ सहकाऱ्याची. काही गोष्टीचे बिग, त्याच्यावर शेकेल अशा पद्धतीने फुटू पाहात आहे. वास्तविक ह्या साऱ्या मडळीना 'पुढे' आणण्यात पुढाकार श्री. चिदबरम् ह्यांचाच तर कुलगुरु टोपे व रजिस्टार ह्याचेही सबध तसे 'जुने' आहेत. मागे चिदबरम् साहेब असिस्टट रजिस्ट्रार होते. विद्यापीठ नियमानुसार रजिस्ट्रारपदी विराजमान होणारी व्यक्ती किमान कायद्याची पदवीधर असावी लागते. तेव्हा त्या पदावर नजर ठेवून असि. रजिस्ट्रार चिदबरम् ह्यानी लॉसाठी नाव नोदवले. गमत ही, कुठलीही रजा न घेता वा काही न करता, त्याची हजेरी पूर्ण भरली. पहिल्या एल्. एल्. बी. ला साहेब पहिल्या वर्गात पहिले आले. त्या काळात त्याचा विद्यापीठ परीक्षा विभागाशी घनिष्ट सबध होताच. ह्या प्रकाराची पुढे मोठी वाच्यता झाली. कुलगुरु, लॉ कॉलेजचे प्राचार्य, परीक्षक व श्री. चिदबरम् ह्याच्या विरुद्ध जबरदस्त कोलाहल माजले. आणि शेवटी 'एवढ्या' एक्स्ट्रॉऑर्डिनरी करिअरच्या ह्या असामान्य विद्यार्थ्याला पुढे दुसऱ्या (फायनल) लॉची परीक्षा देताच आली नाही! ते त्याचे स्वप्न पुरेच होऊ शकले नाही! (अर्थात त्याची पुढे आवश्यकताही नव्हती म्हणा! कारण पुढच्याच वर्षी सर्व जुने नियम, प्रथा धाब्यावर बसवून चिदबरम्ना रजिस्ट्रार केले गेले. मग वकिलीच्या अतिम परीक्षेचा वेगळा असा काही फायदा नव्हताच!!)

श्री. चिदंबरम् ह्यांच्या ह्या साऱ्या बढती प्रकरणाच्या काळात, प्रा. टोपे हे लॉचे परीक्षक होते, सिनेटचे सदस्य होते, आणि चिदंबरम् ह्यांची त्यांच्याकडे चांगली उठबस होती...तर असे हे जुने संबंध आज तांटातुटीच्या मार्गी लागले आहेत. त्यातूनच इतर काहीच स्थान महत्त्वपूर्ण बनू पाहात आहे.

...असे हे संबंध असल्याने, आणि विद्यापीठातील भ्रष्टाचाराविरूद्ध चारी बाजूनी आवाज उठत असताना काही तरी केल नाही तर, चिदंबरम् विरोधी मोहिमेचा रोख कुलगुरू व इतराकडेही वळणार हे ओघानेच आले. थोडासा 'प्रॅक्टीकल ॲप्रोच' कुलगुरू घेताना दिसतात. तो कदाचित् ह्यामुळेच असावा. असाच काहीसा 'ॲप्रोच' चिदम्बरम् ह्यांचे इतरही काही सहकारी घेऊ पहात आहेत. अर्थात असे लोक थोडे आहेत स्वत:ला काही 'पब्लिक स्टेचर' आहे असे जाणून ह्या प्रकरणात फार रुतण्यापूर्वी बाहेर पडण्यासाठी धडपडणारी ही मंडळी, पण ह्यांच्यापेक्षा दुसऱ्या प्रकारची माणसेच फार मोठ्या प्रमाणात आहेत, त्यांना त्यांचे व्यवहार आहेत तसेच चालू रहावेत असेच अजूनही वाटते. इमारत बांधणी, परीक्षा विभाग, इतर मेंटेनन्स, विद्यापीठ प्रेस वगैरे सर्व क्षेत्रातून ही मंडळी विखुरलेली आहेत. त्या साऱ्यांचा केंद्रबिंदू शेवटी कुठेतरी एकाच ठिकाणी असला तरी त्यांची व्यक्तिश: प्रकरणेही कमी महत्त्वाची नाहीत...

हे सारे अगदी आजच उघडकीला येत आहे असे नाही. तसेच ते केवळ वृत्तपत्राकडूनच उघडकीला येत आहे असेही नाही. सरकारी अधिकाऱ्यांनी केलेल्या चौकशातूनही अशी प्रकरणे बाहेर आली आहेत. त्या विरूद्ध वृत्तपत्रातून रानही उठले आहे. आणि काही व्यक्तींना अशा प्रकरणामुळे विद्यापीठाच्या नोकरीतून मुक्तही केले गेले आहे. आणि अशा लोकांचीही एक मालिकाच आहे. श्री. गजेंद्रगडकर कुलगुरू असताना, श्री. लिंग्रस नावाचे गृहस्थ अकाउंटंट जनरल (A. G.)च्या ऑफिसमधून डेप्युटेशनवर विद्यापीठात आले होते. त्यांनी विद्यापीठाचे हिशोब तपासताना अशी काही प्रकरणे चव्हाट्यावर आणली. श्री. व्ही. के. करमरकर नावाच्या विद्यापीठाच्या सर्व्हेयरला ह्या रिपोर्टसनी गोत्यात आणले. एका प्लगचे बील १५३ रु. दाखवल्याचे आढळून आले. आणि हा भडका उडाला. नंतर इतर प्रकरणे बाहेर येऊ लागली. नि अवघ्या वर्ष दोन वर्षांत सहा-सात लाखाचा फ्रॉड असल्याचे आढळून आले म्हणे. ही फाईल पुढे कशी कोण जाणे पण एकाएकी गायब झाली. नंतर कधी पुढे आलीच नाही. करमरकर विद्यापीठातून बाहेर पडले. अग्निशान गाडी त्यांनी आधीच पैदा केली होती. विद्यापीठातून बाहेर पडल्यावर त्यांनी पॉश हॉटेल टाकले. आज ते आरामात आहेत.

श्री. चंद्रात्रेय नावाच्या इंजिनियराचीही अशीच कहाणी. आता ते विद्यापीठात नोकरीला नाहीत. पण होते तेवढ्या काळात, किमान काही लाखांची माया त्यांनी जमवली असे आज सारे उघड उघड बोलतात... हे जुन्यांचे, तर सध्याचे सुरक्षा अधिकारी श्री. ध्येयाद्री हे पोलिसमधून बाहेर पडून विद्यापीठात आलेले (बाहेर पडलेले की बाहेर फेकले गेलेले?) अवघ्या थोड्या काळात त्यांची मोठी माया जमा झाली आहे अशी वदता आहे. ह्या साऱ्यांचे सूत्र संचालन कसे होते, कुठून होते हे कदाचित ठामपणे सांगता येत नाही. पण एक गोष्ट नक्की, की ह्या साऱ्यांचे फार घनिष्ट संबंध श्री. चिदम्बरम् ह्यांच्याशी आहेत...

...ह्या अशा विविध पद्धतींनी चालणाऱ्या भ्रष्टाचाराचा समग्र अहवाल लिहायचे तर स्वतंत्र ग्रंथ लिहावा लागल. पण काही मोजकी उदाहरणे घेऊन एकेक घटकाचा स्थूल विचार केला तरी, विद्यापीठातल्या भ्रष्टाचारांनी आज कुठली पातळी गाठली आहे ते लक्षात येऊ शकेल. अगदी ठळक उदाहरणे घ्यायची तर विद्यापीठाच्या गेल्या १० वर्षातल्या विविध बांधकामांचा धावता आढावा घेता येईल. वॉटरप्रूफिंग प्रकरणातली गमत मी गेल्या लेखात सांगितली होती. पण प्रत्यक्ष जी बांधकामे गेल्या दहा वर्षात झाली, त्यातल्या गमती ह्याहूनही चमत्कारिक आणि मोठ्या आहेत. गेल्या दहा वर्षात किमान दोन–अडीच कोटीचे बांधकाम झाले. ह्याचा जो एक धावता रिपोर्ट डॉ. वागळेनी राज्यपालांना सादर केला आहे त्यानुसार किमान पन्नास लाखांची अफरातफर ह्या उलाढालीत झाली आहे. डॉ. वागळ्यांनी ह्याची संपूर्ण आकडेवारी दिली आहे, आणि एकूण प्रकरणात संपूर्ण, नि:पक्ष चौकशीची मागणी केली आहे. महाराष्ट्र शासन, केंद्रशासन इथपर्यंत डॉ. वागळे ह्यांनी आपली फिर्याद दाखल केली आहे. पण चौकशीची मागणी होऊन तीन तीन महिने उलटून गेले तरी त्यासंबंधात विद्यापीठ, शासन कुणाचीही कसली हालचाल नाही. डॉ. वागळ्यांनी स्वत:चे पत्रक प्रसिद्ध केल्यावरही विद्यापीठाकडून आरोपांना कसलेही उत्तर दिले गेले नाही. खुलासे झाले नाहीत. हे सारेच विचित्र वाटते. आज चारी बाजूनी आवाज उठू लागल्यावर थोडी खळबळ माजलीय् जरूर, पण अजूनही ह्या मूळ प्रश्नांना बगलच द्यायचे प्रयत्न सुरू आहेत...

डॉ. वागळ्यांनी ५० लाखाच्या अफरातफरीचा आरोप केला आहे. मला वाटते हा आरोप फार मवाळ आहे. विद्यापीठाच्या विविध बांधकामांना भेटी देऊन झाल्यावर, एका प्रख्यात बांधकाम तज्ञाचा अभिप्राय असा पडला की, '...आजच्या किंमती लक्षात घेऊनही, ह्या सर्वच बांधकामांची एकूण किंमत जेमतेम सव्वा ते दीड कोटीच्या घरात जाईल. १९७१–७२ पूर्वीच्या किंमती लक्षात घेतल्या, तर उधळला गेलेला पैसा (किंवा अफरातफर) Excess Spending) किमान नव्वद ते शंभर लाखाच्या घरात असावा...' ह्या साऱ्याची ढोबळ कल्पना शेवटी दिलेल्या (पृष्ठ २३ वर) तक्त्यावरून येऊ शकेल....पण गमत कशी घडत जाते हे सांगण्यासाठी इथे एक-दोन उदाहरणे जरूर सांगितली पाहिजेत.

**१. कुलगुरूंचे निवासस्थान (तात्पुरते) :** विद्यापीठाच्या पॅव्हिलियनच्या कॅंटीनच्या वर पहिल्या माळ्यावर घाईघाईने उभारण्यात आलेला १५०० चौ. फुटाचा फ्लॅट म्हणजे हे व्ही. सी. लॉज. १९६९ मध्येच ओपिनियन ह्या साप्ताहिकातून ह्या लॉजच्या आवश्यकतेवर ए. डी. गोखालांनी खरपूस टीका केली होती. 'जनतेच्या पैशाची उधळपट्टी' असेच त्यांचे वर्णन त्यांनी त्यावेळी केले होते. शासनाने व्हीसींना वार्डन रोडवर जागा उपलब्ध करून दिली होती. खेरीज, कालिना येथील नव्या विद्यानगरी कॅंपमध्ये त्यांच्या बंगल्यासाठी खास सोय करण्यात आली होती. असे असता वास्तवात, ह्या तात्पुरत्या निवासस्थानाची काही आवश्यकता होती असे वाटत नाही. पण तरीही, तशी मुद्दाम सोय करण्यात आली....आणि चार

खोल्यांच्या ह्या साध्या ब्लॉकवर, केवळ बांधकामावर १,७३,३०० रु. खर्चही करण्यात आले ! सॅनिटेशन, विद्युतीकरण, पाण्याचे पंप, आर्किटेक्टची फी वगैरेवर वेगळा खर्च झाला. आणि हा एकूण खर्च साडेतीन लाखांच्या घरात झाला. ह्यात जमिनीची किंमत, भराव, फाऊंडेशन वगैरे प्रश्न नव्हेतच ! कारण मूळच्या इमारतीच्या पहिल्या मजल्यावर ह्या चार खोल्यांच्या ब्लॉकची उभारणी करण्यात आली होती. म्हणजे जमिनीचा वगैरे खर्च वजा जाता, बांधकामाची किंमत सुमारे दरचौरस फुटाला सुमारे २३५ रुपये पडली. फोर्टातल्या किंवा कफ परेड, पेडर रोड सारख्या महागड्या विभागातील बांधकामाची एवढी किंमत आजही नाही. तर ह्या लॉजचे बांधकाम चार-पाच वर्षापूर्वीचं ! ६७ च ! !

ह्या लॉजच्या पुढील गंमतीही उद्धृत करण्यासारख्या आहेत. ह्या लॉजच्या बांधकामासाठी, निविदा (टेंडर्स) मागविल्या गेल्या त्या वृत्तपत्रांतून जाहिराती देऊन नव्हेत, तर विद्यापीठाच्या आर्किटेक्टने ओळखीच्या तीन-चार कंत्राटदारांना गाठून मागून घेतल्या ! त्यात हरिभाई वी. देसाई ह्यांचे टेंडर सर्वात महागडे होते. त्यांचे टेंडर होते १,२१,००० चे. सर्वात कमी किंमतीचे टेंडर १,०१,०००. च तरीही टेंडर स्वीकारले गेले श्री. देसाईंचे. थोडी किंमत कमी करून १,०६,००० ला. तसे श्री. देसाई हे विद्यापीठाचे लाडकेच आहेत. पण ही चलाखी आटोपताच दोन-तीन महिन्यातच, ज्यादा रक्कम श्री. देसाईंना मंजूर केली गेली. १,०६,००० च्या ऐवजी फक्त रु. १,७९,०००।– ! (B. C. ७–१–६७–१०) आणि प्रत्यक्षात श्री. देसाईंना पैसे दिले गेले ते रु. १,७५,०००।– (B. C. २३।११।६७ –४)

ह्या नंतर प्रश्न आला इमारतीच्या प्लंबिंग आणि सॅनिटेशनचा ! पुन्हा श्री. देसाईंची निविदा सर्वात महागडी रु. १२,९०० ची. पुन्हा तीच चलाखी. थोडी किंमत कमी करून काम देसायांना दिले गेले. रु. १०,३०० ला आणि शेवटी प्रत्यक्ष खर्च झाला तो १७,३०० रु (B. C. २३।११।६७–५) हीच कथा चार खोल्यांच्या साध्या ब्लॉकच्या विद्युतीकरणाची ! महागडे टेंडर स्वीकारले गेले ते रु. ८९०० च. त्यात सात पंखे बसायचे होते. दोन गिझर्स, आणि इतर लाईटिंग. प्रत्यक्षात, शेवटी खर्च आला तो रु. ११,३०० चा. तरीही पंखे बसले तेही कमीच ! इथपर्यंत, इमारतीवर, २,१०,००० खर्च झाला होता आणि दर पडत होता, १४० रु. / चौरस फूट.






हा बेफाट खर्च कमी वाटला म्हणून की काय, पुढेही ही उधळपट्टी चालूच राहिली. तीन वातानुकुलीकरण यंत्रे (एअर कंडिशनर्स) १२,००० रुपये खर्चून बसवली गेली. '१९६७ ची ह्या यंत्रांची किंमत, रु. १२५० पेक्षा कधीही जास्त नव्हती.' म्हणजे ३ यंत्रांना जास्तीत जास्त ४०००।– रुपये. प्रत्यक्ष खर्च मात्र १२०००।–... फर्निचरवरचा खर्च ३३,५०० दाखवला गेला आहे. १९६७ च्या किंमती लक्षात घेता, एवढ्या किंमतीचे फर्निचर चार खोल्यांत मावताही आल नसत ! आणि प्रत्यक्ष खोल्या ज्यांनी पाहिल्या, त्यांना खरेदीच्या यादीतल्या कित्येक वस्तू तिथे आढळल्याच नाहीत. ज्या आढळल्या त्यांची आजची एकूण किंमतही रु. २५००० च्या आत आहे. ६७ च्या किंमती लक्षात घेतल्या तर ती जेमतेम १५००० च्या आसपास असेल !

प्लंबिंग व सॅनिटेशनच्या बाबतीत मूळ रकमेपेक्षा अधिक खर्च (रु. १७,३००) तर झालाच, पण त्यातही आणखी गोंधळाची बाब म्हणजे इमारतीच्या बांधकामाच्या टेंडरमध्ये ह्या कामासाठी रुपये १३,००० ची वेगळी तरतूद होती आणि तेही पैसे दिले गेले. (B. C. 7–1–67–10) म्हणजे चार खोल्यांच्या ह्या छोटेखानी ब्लॉकच्या प्लंबिंग-सॅनिटेशनसाठी (नळ व संडास, बाथ, सांडपाणी) रु.३०,००० वर खर्च झाला. तज्ज्ञांच्या अंदाजानुसार तो जेमतेम १०,००० च्या घरात असायला हवा...विद्यापीठाच्या पॅव्हिलियनच्या संडासाच्या व व्ही. सी. लॉजच्यामध्ये एक साधं लाकडी पार्टिशन उभारलं गेलं आहे. किंमत काय असावी ? फक्त रु. १६०००/– ...पन्हाळ्यांसाठी खर्च २२४००/–, गॅरेज (साधं पत्र्याचं !) ९००० रु., लिनोलियम (त्यांचा मागमूस लॉजवर दिसत नाही !) रु. १६००/– हे सारे लक्षात घेतले तर एकूण खर्च ३,२०,००० रुपयांवर ! ! आणि प्रत्यक्षात हा खर्च खराखुरा किती झाला असावा ? तज्ज्ञांच्या अंदाजानुसार आणि १९६६–६७ च्या किंमती लक्षात घेता हा खर्च जेमतेम दोन लाखांच्या घरात असावा ! म्हणजे इथे काळा पैसा तयार झाला तो फक्त रु. १,२०,००० ! !

प्रत्यक्ष बांधणीचा खर्च दर चौरस फुटास इथे रु. ११६/– पडला आहे. इतर सर्व सुखसोयींसह (एअर कंडिशनर्स, फर्निचर वगैरेसह) रु. २३५ दर चौ. फुटास. आश्चर्याची बाब, ह्याच वर्षी विद्यापीठाचे आणखी एक बांधकाम पूर्ण झाले. त्याचा बांधकामाचा दर काय असावा ? फक्त रु. २८/– दर चौरस फुटास ! हां. एक महत्त्वाचा फरक मात्र होता. ह्या बांधकामाचे कॉन्ट्रॅक्टर होते धनजीशा भेडवार आणि कं. आणि ११६/– रु. फुटाचे कंत्राटदार होते विद्यापीठाचे लाडके श्री. देसाई ! !

**२ : विद्यापीठ क्लब हाऊसच्या** प्रकरणाने, व्ही. सी. लॉज प्रकरणावरही कडी केलेली आहे. ह्याचेही सर्वात महागडे टेंडर स्वीकारले गेले. रु. ९,८५,००० चे. पण आता बांधकामावर झालेला खर्च सतरा लाखांवर गेला आहे. ह्यातला मूळ खर्च टेंडरबरहुकूम, ९,६१०००, मध्ये बसवला गेला हे खरे, पण इमारत उभी राहताच अवघ्या दोन वर्षात अडीच लाख रुपये विस्तार, दुरुस्त्या, डेकोरेशन

**पृष्ठ २२ वर**

# रोझेस इन डिसेंबर

**अनुवाद : विनय धुमाळे**
**लेखांक : आठ**



**महंमद करीम छगला यांच्या रोझेस इन डिसेंबर या आत्मचरित्राचा धावता परिचय**

प्लेटोने वर्णन केल्याप्रमाणे राधाकृष्णन म्हणजे एखाद्या तत्त्ववेत्त्या राजाप्रमाणे होते. ते एक तरल बुद्धिमत्तेचे तत्त्ववेत्ते होते यात शंकाच नाही. सदैव ते तत्त्वज्ञानाच्या अभ्यासात गढलेले असायचे. त्यामुळे एखाद्याला असं वाटण्याची शक्यता आहे की राजकारणाचे रंगढंग त्यांना मानवत नसावेत. जरी ते थोर तत्त्ववेत्ते व विचारवंत होते तरी त्यांचे पाय मात्र सदैव जमिनीवर असायचे. दिल्लीत राजकारण कसं चालतं याची त्यांना पूर्ण जाणीव असायची. कुठल्या मंत्र्याची उचलबांगडी होणार आहे. कुठला मनुष्य मंत्री म्हणून नेमला जाणार आहे याची त्यांना पूर्ण कल्पना असायची. राजकारणाच्या चाललेल्या उलाढालीदेखील त्यांना पूर्णपणे ज्ञात असायच्या. कुठल्या भानगडी किती खऱ्या नि किती खोट्या हे सुद्धा त्यांना चांगलंच ठाऊक असायचं.

माझ्याशी ते सदैव अत्यंत चांगले वागले. जेव्हा जेव्हा मी त्यांच्या राष्ट्रपतीभवनाच्या शयनगृहात जायचो तेव्हा तेव्हा ते आपल्या भोवती पसरलेल्या कागदांच्या फापट पसाऱ्यात कुठल्यातरी अभ्यासात मग्न असायचे. त्यांचं बोलणं ऐकणं म्हणजे एक पर्वणी असायची. खुद्द पं. नेहरू देखील अनेक वेळा तेथे येत व मनःशांतीकरता त्यांच्याशी वार्तालाप करीत.

त्यांना संगीताची फार गोडी होती. अनेक नामवंत कलाकारांना ते राष्ट्रपतीभवनावर बोलवीत व त्यांच्या त्या मैफलींना अनेक वेळेला उपस्थित रहाण्याचं भाग्य मला लाभलं आहे.

पण शेवटी शेवटी ते फार निराश, उद्विग्न झाले होते. देशात जो प्रचड भ्रष्टाचार चाललेला असे त्या विषयी ते अत्यत कठोरपणे आपली मत व्यक्त करायच या त्यांच्या टीकेवरही काही लोक नाराज असायचे. त्याना वाटायचे, की राष्ट्रपती आपली मर्यादा सोडीत आहेत. पण राष्ट्रपती म्हणून स्वत च्या कर्तव्याने ते प्रेरित झाले होते त्यामुळे कधीही सधी मिळाली की घसरत चाललेल्या सामाजिक नीतीमूल्यांवर ते सदैव कठोर प्रहार करीत.

त्या मानाने झकीर हुसेन म्हणजे अगदीच वेगळी व्यक्ती होती. राधाकृष्णन याच्यासारखे ते प्रकाडपडित जरी नसले तरी त्याच्या व्यक्तीमत्वाचा पोत अत्यत शानदार होता. एक अत्यत सुसस्कृत व्यक्तीमत्त्व म्हणून त्याच्याकडे बोट दाखवता येईल. त्यांना बागकामाची फार आवड होती. विशेषत' गुलाबाच्या अनेक जाती त्यांच्या बागेमध्ये असायच्या.

उर्दू भाषेवरती त्याच विलक्षण प्रभुत्व होत. मला वाटत ते शेक्सपीअर उर्दूमध्ये अनुवादित करीत होते. मला आठवत, की मी जेव्हा मत्रिपदाचा राजीनामा दिला तेव्हा त्यानी मला खास बोलावून घेतल व मी दाखविलेल्या धैर्याबद्दल माझ कौतुक केलं. ते मनाने अत्यत धार्मिक वृत्तीचे होते. पण ते धर्मवेडे कधीच नव्हते. राजकारणात अथवा सामाजिक जीवनात त्यानी धर्माच स्तोम कधीच माजव ं नाही.

### अथांग मानवतावादी....

नेहरू ! प. नेहरूविषयी लिहिताना ज्या अनेक लोकानी नेहरूविषयी लिहिल आहे त्यालाच मी परत पुष्टी जोडणार आहे. आपल्या येथे जे अनेक लोक मुख्यमंत्री अथवा प्रधानमंत्री झाले तेव्हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला या मत्रिपदामुळे शोभा आली. पण नेहरूच व्यक्तिमत्त्वच अस होत, की त्यानी पतप्रधानपद स्वीकारल्यामुळे जणू त्या पदालाच शोभा लाभली होती. वैभव लाभल होत. नेहरूच वर्णनच करायच झाल तर एक अथाग मानवतावादी म्हणूनच कराव लागेल. जनसामान्याविषयी त्यांच्या मनात जी सहानुभूती होती त्याला तोड नव्हती.

त्याच्या हाती अफाट सत्ता होती पण ते जनसामान्यांना कधीच विसरले नाहीत. मानवीसबधात व लहान लहान मुलात तर ते अगदी आवडीने रस घ्यायचे. ज्याप्रमाणे नेहरू मानवतावादी होते त्याचप्रमाणे नेहरू अत्यत प्रखर व्यवहारवादीही होते. धर्म हा माणसाला परावलबी, आळशी बनवतो अस त्याच मत होत.

नेहरू लोकशाहीचे निस्सीम उपासक होते. अनेक वेळा पार्लमेंटच्या कामकाजाच्या पद्धतीमुळे अथवा न्यायसस्थेच्या अत्यत धीम्या चालीमुळे ते चिडायचे पण त्या विषयी ते कधीच अनादर दाखवायचे नाहीत. न्यायसत्तेविषयी त्याना सदैव आदर होता. ते हाडाचे राष्ट्रवादी होते. त्यामुळेच तर प्रात अथवा जात अथवा धर्म याच्या ते सदैव पलीकडे राहिले

मी जेव्हा केंद्रीय मत्री झालो तेव्हा त्यांच्या एका सहकाऱ्याने मला सांगितले, की मत्रिमडळाची बैठक म्हणजे निव्वळ औपचारिकपणा असतो. नेहरू एखादा मुद्दा मांडीत व त्याला सगळ्यानी हो म्हणायच असत. मग बैठक सपते.

पण मला वाटत या मताला मान्यता देण म्हणजे नेहरूवर अन्याय केल्यासारख होईल. त्यांना टीका सहन होत नसे हे खरं आहे व तसे ते थोडे शीघ्रकोपी होते हेही खर आहे. पण तुम्ही जर एखादा मुद्दा माडायला लागलात व त्यात तथ्य असलं तर ते तुमचा मुद्दा व्यवस्थित ऐकायचे व आपल मत बदलायचेदेखील. प्रथम तुम्ही जर त्याच्याविरुद्ध मत माडल तर ते तावडतोब म्हणायचे ' व्हॉट डू यू मीन ?' पण जर का त्या मुद्यात तथ्य असल तर ते आपल मत बदलायचे. याचा अनुभव मला अनेक वेळा आला आहे.

मला वाटत मी शिक्षणमत्री झाल्यावर का त्याच्या दुसऱ्याच दिवशी एक फाईल चाळताना मला आढळल, की नेहरू एका महारोगाच्या हॉस्पिटलच्या उद्घाटनाला आग्र्याला जाणार होते. ते हॉस्पिटल जपानी लोकानी खास भेट म्हणून बांधून दिलं होत. पण त्यात एक अडचण अशी होती की ते हॉस्पिटल अगदी ताजमहालच्या बाजूलाच होतं. आता ताजमहाल म्हणजे भारताच एक प्रमुख वैभव व त्याच्या शेजारी कुष्ठरोगाचं हॉस्पिटल. मला काही हे पटेना. एकतर त्याने ताजमहालला भेट देणाऱ्या प्रवाशात घबराट निर्माण झाली असती. पाकिस्तानला प्रचार करायला सधी मिळाली असती व एकदर ताजमहालच्या बाजूला कुष्ठरोगाच हॉस्पिटल हे मनाला पटेना. तसाच मी धावतपळत नेहरूकडे गेलो व विषय काढला. ते भयानक सतापले. ' या आधी तुम्ही काय करीत होता ' याबद्दल मला त्यानी जाब विचारला व म्हणाले, की ती जपानी लोकाची भेट असल्याने आता त्याविरूद्ध काही करण म्हणजे त्या लोकांचा अपमान झाल्यासारखे होईल. मी त्याना हरतऱ्हेने पटवून द्यायचा प्रयत्न केला, पण नाही. ते म्हणाले, की जर जपानी राजदूताने याला परवानगी दिली तरच ते विचार बदलू शकतील व उद्घाटन करायच की नाही यावर विचार करतील.

मी लगोलग जपानी राजदूताकडे गेलो व त्याला सार काही समजावून सांगितल, पण नाही. तोही गृहस्थ काही पटवून घ्यायला तयारच नव्हता. शेवटी मी एक तोडगा काढला की त्या वास्तूत फक्त कुष्ठरोगाविषयी सशोधन होईल. प्रत्यक्ष काही कुष्ठरोग्याच ते हॉस्पिटल राहाणार नाही. या तोडग्याला मात्र तो जपानी राजदूत तयार झाला.

मी नेहरूकडे अनेक वेळेला गहिलोय. जेव्हा मी त्यांच्याकडे प्रथम राहायला गेलो तेव्हा रात्रीचे १० वाजले होते. मी त्याच्या सेवकाला सागितले, की मी पतप्रधानांना भेटायला जातो. तर नेहरूनी नोकराकडूनच निरोप पाठवला, की काम सपल्यावर मीच खाली येईन. या इथे हेही नमूद केलं पाहिजे, की पहाटे १-२ च्या आधी नेहरू कधीच झोपले नाहीत. पहाटे १-२ पर्यंत त्याच काम चालायच. आलेल्या असख्य फायली ते लक्षपूर्वक वाचायचे. त्यावर आपली मते लिहून एका रात्रीत ते फायलीचा ढीग वाचून पुरा करायचे. प्रत्येक फाइल तितक्याच एकाग्रतेने वाचायचे हे बघितल्यावर नकळत मनात विचार येतो या पार्श्वभूमीवर आज काय चाललं आहे ! महिनोन्‌महिने अनेक मुख्यमंत्री अथवा मत्री पत्राची साधी पोच देत नाहीत. अनेक मत्र्याना मी महत्त्वाच्या प्रश्नावर विचार विनिमय करण्याकरिता लिहायचो व त्यांच्या उत्तराची वाट बघत अक्षरश: महिना महिना थाबायचो स्वत च स्थान नक्की बळकट करण्याच्या राजकारणात फायली बघणे व या महत्त्वाच्या प्रश्नावर

निर्णय घेणे व हे आपलं काम आहे हे अनेक मत्री विसरूनच गेले आहेत.

...मी नेहरूच्या बगल्यात माझ्या खोलीत बसलो होतो इतक्यात सागून पाठवल्याप्रमाणे स्वत नेहरूच खाली आले व त्यानी माझ स्वागत केल. १५ एक मिनिटे गप्पा मारल्या व आपल्या कटाळवाण्या दररोजच्या कामाला परत वरती निघून गेले.

त्याना शेवटच मी पाहिल म्हणजे युनोच्या बैठकीला मी जायच्या आधी. माझ विमान वेळेवर मला पकडता याव म्हणून तेच सारखे घड्याळात बघत होते. शेवटी तर त्यानी मला अक्षरश हाताला धरून उठवल. मी परत आलो तेव्हा कळल, की नेहरू विश्रातीकरिता डेहराडूनला गेले आहेत. मी म्हटल, उगीच त्याना भेटून त्याच्या भेटीत व्यत्यय का आणा? त्या दिवशी जेवतानाच माझा अटेंडट धावत आला व त्याने नेहरू गेल्याची दु खद बातमी दिली. शेवटी शेवटी ते थकलेले, कटाळलेले दिसत होते. पण केवळ सवय म्हणून ते अखेरपर्यंत काम करीत राहिले. नेहरूच्या एकदर जीवनाकडे बघितल की मी मघाशी जे सागितल तेच खर वाटत. त्याच्यामुळे पतप्रधान या पदाला भूषण आल.

त्यामानाने लालबहादूर शास्त्री एकदमच वेगळे होते. इतक्या उच्चपदी मनुष्य इतका साधा राहू शकतो यावर सहसा कोणाचा विश्वासच बसणे कठीण. पण लालबहादूर याच्या बाबतीत मात्र ते शभर टक्के खर होत. त्याना माहीत होत, की आपण सध्या जी एक भूमिका वठवत आहोत त्या भूमिकेत प. नेहरूसारख्या झजावाती व्यक्तिमत्त्वाने स्वत ला झोकून दिलं होत. नेहरूच अफाट व्यक्तिमत्त्वही त्याना लाभल नव्हत की त्याची बॅकग्राऊडही शास्त्रीना समजली नव्हती. पण शास्त्रीच मोठपण ह्यातच होत की, या साऱ्या गोष्टीची त्याना अत्यत खोलवर जाण होती व स्वत च्या व्यक्तित्त्वाला मानवतील अशाच गोष्टी त्यानी केल्या व स्वत च वेगळेपण राखल. एकदा पार्लमेंटमध्ये परदेशी गाड्यावरून वादविवाद चालू असताना ते अचानक उभे राहिले व म्हणाले 'अध्यक्ष महाराज, पण मी मात्र कधीच परदेशी मोठ्या गाड्यातून जात नाही. कारण मग मी त्यात कुठल्याकुठे दडला जाईन' त्याच्या व्यक्तिमत्त्वाची ही अगदी विशिष्ट घडण. सार्वमतावर त्याचा विश्वास होता. विचारविनिमयावर त्यामुळे ते साहाजिकच जास्त भर देत. विरोधी पक्ष काय किंवा स्वत.चे सहकारी काय, त्याची मत लक्षात न घेण म्हणजे राजकीय-नैतिक दृष्ट्या चूक आहे अस वाटायच. त्यामुळे कुठल्याही महत्त्वाच्या प्रश्नावर ते नेहमीच विरोधी पक्षनेत्याशी अगोदर विचार विनिमय करून कुठेतरी समान दृष्टिकोन निघू शकेल का बघायचे.

मला वाटत की, अलीगड मुस्लीम बिलाच्या वेळी काही जात्यध मुसलमानानी हवा अगदी तप्त करून ठेवली होती. त्यामुळे त्यानी अनेक वेळेला मला विचारल, 'तुम्ही काय करीत आहात ते बरोबर आहे याची खात्री आहे ना?' मी त्याना सागितले की, 'हा एक तत्त्वाचा प्रश्न आहे.' राष्ट्रवादी मुसलमान माझ्या बाजूने होते तर पार्लमेंटमध्ये ज्या दिवशी याच्यावर वादविवाद चालला होता तो दिवस होता शुक्रवारचा. त्यामुळे शास्त्रीजीनी मला विचारल, 'बहुसख्य मुसलमान सभासद या वादविवादात भाग घेऊ इच्छितात. पण आज तर शुक्रवार आहे. जर आपण तो वादविवाद पुढ ढकलला तर चालणार नाही का?' मी त्याना सागितले की, 'धार्मिक बाबीकरता पार्लमेंटने स्वत च्या कामकाजात कधीच बदल केला नव्हता व आजही तो करायची जरूर नाही.' माझा निर्णय त्याना पसत पडला नाही. लहानसहान गोष्टीकरता लोकाना का दुखवा, हा त्याचा दृष्टिकोण. मी ही घटना एवढ्याकरता सागितली की, लालबहादूर केवळ मताकरताच अल्पसख्याकाची मनधरणी करीत नव्हते. तर दोन्ही जमातीत खरोखरच शाततापूर्ण व स्नेहपूर्ण सबध असावेत अशी त्याना आतरिक तळमळ होती.

## मी शेवटपर्यंत बसू का?

पाकिस्तानच्या आक्रमणाच्या वेळी याच माणसाने खबीर भूमिका घेतली. त्यानी ताश्कद करारावर सही केली तीसुद्धा युद्धाच्या भीषण परिणामाना थोपवून धरण्यासाठी. त्याना पार्लमेंटमध्ये यावर किती टीका होईल याची पूर्ण माहिती होती. त्यामुळे शाततेची हाक देताना स्वतःच्या राजकीय भविष्याचा त्यानी मुळीच विचार केला नाही.

त्याच्या साधेपणाची एक गोष्ट माझ्या मनात अगदी ठसली आहे. आम्ही सारे 'माय फेअर लेडी' बघायला गेलो होतो. शास्त्रीजीच्या वेळापत्रकाप्रमाणे ते फक्त मध्यतरापर्यंत बसणार होते. पण सिनेमा बघताना त्याना तो इतका आवडला की, त्यानी हळूच माझ्या कानात इटरव्हल झाल्यावर विचारल, मी शेवटपर्यंत पिक्चरला बसलो तर ते वाईट दिसेल का? कारण पिक्चर फारच चागला आहे.' मी त्याना सागितल की, 'भारताच्या पतप्रधानाना खेील एखाद दिवस हौसमौज करण्याचा हक्क आहे अर्थात तुम्ही बसलच पाहिजे.'

असा त्याचा साधेपणा.

आपल्या एखाद्या सहकाऱ्याविषयी व जी व्यक्ती सध्या भारताच्या पतप्रधानपदावर आहे तिच्याविषयी लिहिण फारच कठीण. कारण त्यातल एखादच मत सदर्भाबाहेर काढून परदेशी मासिकात दिल जात व घोटाळे होतात. पतप्रधानावर प्रसिद्धीचा इतका झोत असतो, की अशा गोष्टी हमखास घडतात. त्यामुळे त्याच्याविषयी लिहिताना मी फारच काळजीपूर्वक लिहिणार आहे.

आम्ही सहकारी व्हायच्या अगोदर अनेक वेळेला भेटलो असू. पण प्रत्येक वेळेला मला त्या अत्यत लाजऱ्या, अबोल व वडिलाच्या प्रचड व्यक्तिमत्त्वाखाली दबलेल्या अशा वाटल्या. त्यानतर नभोवाणी खात्याच्या मत्री म्हणूनही मी त्याना जवळून बघितल. पण सहसा लोकसभेत त्या प्रश्नाच उत्तर कधीच देत नसत एखादा डेप्युटी मिनिस्टरच प्रश्नाच उत्तर देई.

त्या जेव्हा अॅटोमिक एनर्जी खात्याच्या मत्री होत्या तेव्हा त्या मला सारख्या विचारायच्या, माझ्या खात्याचा प्रश्न आज निघेल का? व पाच वाजेपर्यंत जर प्रश्न निघाला नाही तर समाधानाचा सुस्कारा सोडून त्या सभागृहाबाहेर जात व एखादेवेळेला जरी त्यानी उत्तर दिलच, तरी लिहून आणलेल्या नोट्सचा त्या वारवार उपयोग करीत. यामुळे त्याच्या उत्तराचा परिणाम पुष्कळच कमी होई.

त्यामुळे त्याचा देशाच्या सर्वश्रेष्ठनेतेपदापर्यंतचा प्रवास मला आश्चर्याने थक्क करतो. हा प्रवास अक्षरश. स्तिमित करणारा आहे.

आज त्या अत्यंत समर्थ वक्त्या बनल्या आहेत. लोकसभेत त्यांची भाषणं नेहमीच विरोधी पक्षाची धूळधाण उडवणारी असतात. आजकालची त्यांची लोकसभेतली भाषणं वा उत्तरं अत्यंत मोजकी व परिणामकारक असतात. पं. नेहरू हे संसदपटू होते, पण राजकारणातल्या पवित्र्यांची त्यांच्या मुलीला जी जाण आहे, ती मी मी म्हणणाऱ्यांपाशीही नाही आहे. त्यांचे राजकारणातले मार्ग कठोर असतील, काही वेळेला गांधीजींच्या तत्त्व प्रणालीशी सुसंगत नसतील पण त्यांनी त्यांच्या राजकीय विरोधकांना अक्षरशः खडे चारले आहेत. साऱ्या विरोधकांची त्यांनी तोंडे बंद केली. वर्षानुवर्षे सत्तेच्या खुर्च्या अडवून बसलेल्या अनेक मुख्यमंत्र्यांना क्षणार्धात त्यांनी जमिनीवर लोळण घ्यायला लावली. प्रत्येक राज्यात काँग्रेस पक्षाची बैठक व्हायची व त्यात ठराव संमत व्हायचा, मुख्यमंत्री पंतप्रधानांच्या इच्छेनुसारच निवडला जाईल असा. राज्यामागून राज्यातल्या ह्या बातम्या वाचून हसू येतं.

आज त्या जगातल्या काही अत्यंत बलवान राज्यकर्त्यांमधल्या एक आहेत. त्यांच्या हाती असलेल्या सत्तेला दिशा नाहीत. इतकी ती अफाट व विस्तीर्ण आहे. त्या म्हणतील तो आज कायदा आहे. त्यांचा शब्द कायदा आहे. त्यांच्याएवढी सत्ता असलेला दुसरा जागतिक नेता मिळणे दुरापास्त. देशातल्या सर्व सत्ताउगमावरती त्यांचं संपूर्ण नियंत्रण आहे. त्या आपल्या सहकाऱ्यांशी औपचारिक चर्चा करीत असतील पण खरं काय आहे ते त्यांनाही माहीत आहे व सहकाऱ्यांनाही. सरते शेवटी त्यांचा शब्द प्रमाण ठरणार आहे व त्यावरच राज्य चालणार आहे.

आजपर्यंत त्यांचे विरोधक त्यांच्यावर आरोप करीत होते, की त्या हे सारं स्वतःच्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षेकरिता करीत आहेत. स्वतःच्याच भरभराटीकरिता करीत आहेत. पण नुकतंच झालेलं भारत पाकिस्तान युद्ध पाहून व त्यांची हाताळणी पाहून विरोधकांनीही आपल्या टोप्या त्यांच्याकरिता हवेत उंचावल्या आहेत. भारत-पाकिस्तान युद्धात त्या एक महान नेत्या ठरल्या. त्यांचे पवित्रे केवळ अजोड ठरले. अमेरिकन धमकावणीस भीक न घालण्याच्या त्यांच्या धैर्यापुढे कौतुकाशिवाय मनात कुठलीच भावना येत नाही. एकतर्फी शस्त्रसंधी करण्याच्या त्यांच्या पवित्र्याने तर त्यांनी गरुडझेप घेतली व भारताला आंतरराष्ट्रीय राजकारणात उंचावर नेऊन बसवलं. त्यांनी सिमला करारही साधला. एखाद्या क्षेत्रात नवखा म्हणून प्रवेश करून क्षणार्धात त्या क्षेत्रावर प्रभुत्त्व मिळवण्यासारखं इंदिराजींच्या कौशल्यासारखं दुसरं उदाहरण मी पाहिलं नाही.

पण यशालाही दुसरी बाजू नेहमीच असते. त्यांच्याबद्दल सारी गोड गोड चित्रंच मला उभी करायची नाहीत. एवढी सत्ता एखाद्या व्यक्तीच्या हाती केंद्रित झाल्यावर त्या व्यक्तीचा तोल रहाणं कठीण. लोकशाही संस्था व प्रघात याविषयी नकळत दुरावा निर्माण




होतो. कारण सर्वांचं मत लक्षात घ्यायचा प्रसंग येतोच कुठे? त्यामुळे जास्तीत जास्त वेळी अशा प्रसगी सत्ता व्यक्तिकेंद्रित होते. त्यामुळे योग्य टीकेकडे दुर्लक्ष केल जात.

भारताच भवितव्य पुष्कळ अशी त्याच्यावरच अवलबून आहे. जर सत्ता, इदिराजीना थोडचा सौम्य, थोडचा कमी कठोर करू शकली तर त्यासारख भाग्य नाही. त्याच्या हाती इतकी सत्ता आहे की त्याना कुठलीच सबब पुढे करता येणार नाही. जर त्यांनी दिलेली वचन त्यांना पाळता आली नाहीत, तर ते सपूर्णपणे त्याच व्यक्तिगत अपयश ठरेल. पण जर त्या वचने पाळू शकल्या तर इतिहासात एक महान नेत्या– 'ज्यानी कठीण समयी भारताला तारले' म्हणून त्याची स्तुती लिहिली जाईल.

जरी पार्लमेंटमध्ये अनेक वेळेला मला मनस्ताप भोगावा लागला तरी पार्लमेंटमधले प्रत्येक मिनिट मी एन्जॉय करायचो. जेव्हा मत्र्याला प्रश्नाची उत्तर द्यायची असतात त्या वेळी तर मला जास्तीत जास्त आव्हान मिळालेल आहे. पण ते वादविवाद मला मनापासून आवडायचे. मत्र्यावर अनपेक्षित सप्लीमेंटरी प्रश्नाची सरबत्ती झाल्यावर जे आव्हान स्वीकाराव लागत ते स्वीकारण्यात मला नेहमीच आनद वाटत आला आहे. माझ बुद्धिकौशल्य या प्रश्नोत्तराच्याच तासाला मला काही वेळा अक्षरशः पणाला लावाव लागल आहे.

पार्लमेंटमध्ये कधी कुठल्या प्रश्नावरून वादळ होईल हे सागता येत नाही. कसलीही पूर्वसूचना न मिळता क्षणात पार्लमेंटच्या वातावरणावर ढग जमायचे व विजेच्या कडकडाटासारखे वादविवाद व्हायचे.

सार्वत्रिक निवडणुकीच्या आधी विरोधी पक्षात जे वादकौशल्य होत, बुद्धिवैभव होत आणि ते प्रगट करणारी माणस होती, ती राज्यकर्त्या पक्षातल्या लोकापेक्षा निःसशय वरचढ होती.

माझ्या इग्लिशच्या धोरणाचा निषेध करणारे प्रा. हिरेन मुखर्जी. अस्खलित इग्रजी आणि यथायोग्य माडणी यामुळे ते नेहमीच चटकन लक्षात यायचे. वाजपेयी आधी राज्यसभेत होते. नतर ते लोकसभेत आले. त्याची हिंदी व इग्लिश दोन्ही भाषणे ऐकणाऱ्याला मत्रमुग्ध करीत. श्री. अ. डागे स्वत:च डायलेक्टिकल कौशल्य दाखविण्यात कधीच मागे सरायचे नाहीत. मधू लिमये अत्यत तळमळीचा व मेहनती ससदपटू. बिहार सरकारने त्याना कशाकरता तरी अटक केली होती व त्याच्याविरुद्ध ते सुप्रीम कोर्टात आले होते. बिहार सरकारच्या बाजूने मी काम बघत होतो. त्या वेळी त्यानी कायद्याच जे ज्ञान दाखवल ते अक्षरश- अगाध होत. त्यांच कायद्यातल कौशल्य व मांडणी व समज यानी मी स्तिमित झालो. ते विजयी झाले याबद्दल मला आनदच वाटला. त्यानतर मसानी, त्याच्यापाशी नेहमीच पुष्कळ आकडेवारी असायची व त्याचा उपयोग ते अत्यत कौशल्याने करीत. ससद कामकाजातील एक निष्णात ससदपटू म्हणून विष्णू कामत याच्याकडे बोट दाखवाव लागेल. समोरच्या मत्र्याला या ससदीय कामकाजात ते कसे घसरतील हे काही सागता यायचं नाही. समोरच बसणारे आचार्य कृपलानी 'दादा;' त्यांना सारं सभागृहच घाबरून असायच. त्याच्या सथ शैलीत ते बोलायला प्रारभ करायचे व त्याच्या मोजक्या बोलण्याने समोरच्याची अक्षरश· वाट लावून टाकायचे. एल. एम. सिघवी, भारतीय घटनाविषयकच त्यांच ज्ञान अजोड होत. नाथ पै याच्या वाक्चातुर्याला तर तोडच नव्हती.

राज्यसभेत रंगा, डाह्याभाई पटेल, एकनाथ मिश्रा सारेच सरकारच्या धोरणाची धूळधाण उडवायला टपलेले आणि त्यातच सतत उसळणारे राजनारायण. कधी कुठल्या गोष्टीवरून हे महाशय वादळ निर्माण करतील हे सागता यायचे नाही. राज्यसभेचे तेव्हाचे सभापती श्री. गिरी व राजनारायण याच्यामधली चकमक नेहमीच अत्यंत प्रेक्षणीय व श्रवणीय असे.

या आधीच ज्याच्या नावाचा उल्लेख मी करायला हवा होता ते म्हणजे डॉ. लोहिया. अत्यत कुशाग्र व तरल बुद्धिमत्तेमुळे व राजकारणातल्या सखोल ज्ञानामुळे ते नेहमीच एक प्रचड शक्तीस्थान राहिले. सरकारचे ते तीव्र विरोधक होते. विशेषत. पतप्रधानाचे. स्वेटलाना प्रकरणात त्यानी ज्या झजावाताप्रमाणे सरकारवर हल्ले चढवले ते अजून लक्षात आहेत. त्या प्रश्नावरती लोकसभेत प्रचड हलकल्लोळ माजला. पण उत्तर द्यायला मात्र मलाच सागण्यात आल. तस बघितल तर स्वेटलाना प्रकरणाचा व माझा काहीच सबध नव्हता. व त्याच्याशी सबधित असणारे दिनेशसिंग पण अगदी मुरारजीनी सांगेपर्यंत गप्प होते.

अनेक वादविवादात मोठचा हौसेने मी भाग घेतला. एकदा एका वादविवादात बोलताना मी म्हणालो, 'आज सकाळी मी नाथ पैंच भाषण ऐकल व त्याच्या वाक्याचातुर्याने मीही मोहित झालो. त्याचा तीक्ष्ण विनोद मीही समजू शकतो पण आज त्यानी आपल सामर्थ्य पतप्रधानाच्या व माझ्या चारित्र्य हननाकरता म्हणून जे वापरले त्यापेक्षा त्यानी अधिक योग्य कार्यार्थ वापरल तर बर झाल असत. आजवर मी मत्र्याच चारित्र्यहनन ऐकलेल आहे. पण देशाच चारित्र्यहनन जे नाथपैंनी केले त्याने मी अत्यत दुःखी झालो आहे.'

बस्स; माझ भाषण सपल व एकच हलकल्लोळ माजला. नाथ पै म्हणाले की हा त्याचा हक्कभग होत आहे. 'छगला अप्रत्यक्षपणे मी अराष्ट्रवादी वा राष्ट्रविरोधी आहे अस सुचवीत आहेत.' मी उठून सागितल, की तसा काही माझा म्हणण्याचा हेतू नव्हता. पण काही नाही, जो एकदाचा गोधळ माजला तो काही थांबायची लक्षणे दिसेनात त्यामुळे मी नाथ पैंची बिनशर्त माफी मागितली व प्रकरण थडावल.

असे अनेक प्रसग....

शेवटी मी बोललो म्हणजे २४ व्या व २५ व्या घटना दुरुस्तीवर. मी म्हणालो, 'मूलभूत हक्क जे घटनेने नागरिकाला बहाल केले आहेत, त्या हक्कावरती एक भूतपूर्व न्यायमूर्तीच गदा आणतो आहे, किंबहुना त्या हक्काना अग्नी देत आहे ही महान खेदाची गोष्ट आहे.'

[ क्रमशः ]

# दुसरा कोलंबस

वसन्त ज. डोळस

समुद्र शांत होता. आमचं जहाज डुलत डुलत चालल होत. हा प्रवास म्हणजे आम्हाला एक आव्हानच होत. जहाजाच्या क्वार्टर डेकवर मी अंग टाकून पहुडलो होतो. पडल्या पडल्या जहाजाचा वरचा भाग न्याहाळीत होतो. वर तारकानी भरून गेलेलं आकाश होत आणि त्यात डुलत डुलत पुढे चाललेलं शीड पुंगी वाजविल्यावर त्याच्या तालावर डोलणाऱ्या नागासारखं दिसत होतं.

नीरव शांतता आणि रात्र दूरवर पसरली होती. एखाद्या खोडकर मुलासारखा सदान्‌कदा खवळलेला अटलांटिक महासागर शांत पहुडला होता.

मी धरून एकूण नऊजण आमच्या या मोहिमेत होते. माझ्याप्रमाणेच सर्वजण डेकवर पहुडले होते. आमच 'नीना' जहाज उत्तरेच्या दिशेने मार्ग आक्रमीत होत.

केनेरी बेटापासून आमच्या या असामान्य मोहिमेला सुरुवात झाली होती. मोहिमेचा आज सतरावा दिवस होता. मी मनातल्या मनात आकडेमोड करीत होतो. कारण त्या हिशोबावरच आम्हा सर्वांच व 'नीना' या जहाजाच जीवन अवलबून होत.

शेकडो वर्षे झाली असतील त्या गोष्टीला. कोलंबसने एका जहाजातून स्पेनपासून अमेरिकेपर्यंत प्रवास केला होता. 'नीना' हे जहाज म्हणजे कोलंबसाच्या जहाजाची प्रतिकृतीच होती. आणि प्रवासाचा मार्गही कोलंबस ज्या मार्गाने स्पेनहून अमेरिकेला गेला होता तोच मार्ग आम्हीही प्रवासासाठी निवडला होता.

यावेळी ठरल्याप्रमाणे आम्ही साल्वाडोरच्या आसपास पोहोचावयास हवे होते. पण साल्वाडोर यावेळी आमच्यापासून चार हजार मैलांवर राहिले होते आणि तेही पश्चिमेला. ठरलेल्या निर्धारित मार्गापासून आम्ही भरकटत पूर्वेला सातशे मैलावर आलो होतो.

हे सार केवळ अचूक अदाजावर होत. कारण आमच्या जवळ वेळ पहाण्याची व प्रवासाचं अंतर मोजण्याची कोणतीच आधुनिक यंत्र नव्हती.

वारा प्रतिकूल नसला व 'नीना' जहाज ताशी पन्नास मैलाच्या वेगाने गेले तर आपणाला आणखी ऐंशी दिवस प्रवास करता येईल असा माझा अदाज होता.

केनरी बेटापासूच प्रवासाला निघताना आमच्याजवळ सुमारे तीनशे गॅलन पाणी होते. ते सर्व पाणी लाकडाच्या नऊ मोठ्या पिंपात भरून ठेवल होत. हे पाणी आमची मोहीम पुरी होईपर्यंत पुरेल इतकं होत. पण मोहिमेला निघाल्यावर अवघ्या चारच दिवसात पाण्याची दोन पिपे सपली. व प्रवासाला निघाल्यापासून अवघ्या बारा दिवसात उरलेल्या पिंपातील पाण्याला इतकी दुर्गंधी सुटली होती की, त्या पिंपाजवळ उभ रहाण जिवावर येत होत. तरी देखील दहा पिंपातील ३९ गॅलन पाणी आम्ही गाळून दुसरीकड ठेवलं. कारण वेळप्रसगी त्याचाच उपयोग होणार होता.

अशा रीतीने एकीकडे आमच्यापुढे पाण्याची समस्या उभी होती, तर दुसरीकडे अन्नाची. आम्ही मोहिमेवर निघताना ज्या ताज्या भाज्या बरोबर घेतल्या होत्या, त्या काही दिवसातच सडून गेल्या. त्यामुळे भात, रोटी व मास यावरच आम्हाला गुजराण करावी लागत होती. या वस्तूकडे किड्यानी आपला मोर्चा वळविला होता.

मोहिमेतल्या बाराव्या दिवशी आम्ही सर्वांनी जीव तोडून प्रयत्न केला व दोन शार्क मासे पकडले. सर्व त्याच्यावर तुटून पडले व आपली भूक भागविली. कारण आम्ही बरेच दिवस उपाशी होतो. त्यावेळी ते मासे सापडले नसते तर अन्नाविना तडफडून मरण्याची पाळी आली असती.

युरोपचे लोक जेव्हा समुद्रमार्गे प्रवास करतात, तेव्हा प्रवासात पाण्यापेक्षा दारूला जास्त जपतात. मोहिमेवर निघताना आमच्या जवळदेखील भरपूर प्रमाणात दारूचा साठा होता. आमच्याजवळ १७५ गॅलन इतकी दारू होती. रम, स्कॉच, शॅम्पेन, ब्रँडी इत्यादी प्रकार त्यात होते. ही सर्व दारू दहा छोट्या पिपात भरून ठेवली होती. आमच्यापैकी काहीजण चोरून ती पीत असल्यामुळे दारूचा साठाही दिवसेदिवस कमी होऊ लागला होता.

एके दिवशी पाण्याच्या साठ्यापैकी दोन पिपातील पाणी दुर्गंधीमुळे फेकून द्यावं लागल. त्याच दिवशी लोकानी तीन पिपातील दारू पिऊन फस्त केली होती. त्यामुळे मग दारूचे रेशनिंग सुरू करावे लागले. अस करून देखील दारूचा साठा जेमतेम महिनाभरच पुरणार होता.

तात्पर्य, जहाजावरील पाणी, अन्न व दारूमुळे डोक्यात विचाराचे चक्रच सुरू झाले होते. त्यात आणखी एका विचाराची भर पडली आणि ती म्हणजे 'नीना' या जहाजाची आयुर्मर्यादा! 'नीना' या जहाचाचे आयुष्य फक्त सहा महिन्याचेच होते. पण त्यातच समुद्राने त्याला टकरा देऊन देऊन क्षीण बनविले होते. केव्हा त्याचे दोन तुकडे होतील याचा नेम नव्हता. त्याचा पेधा सडला होता. तो केव्हा निकामी होईल व नीना जहाजच आयुष्य सपवील याचा नेमच नव्हता. आणि 'नीनाच' आयुष्य सपुष्टात आल की, आम्हा सर्वांच्या जीवनालाही पूर्णविराम मिळणार हे ओघान आलच!

पेध्याला निकामी बनविण्यामध्ये जितका निसर्गाचा हात होता, तितकाच आमच्य बेसावध वागण्याचाही हात होता. मुंग्या व समुद्रकिड्यांनी खाऊन खाऊन ते लाकूड अधिकच मऊ बनविलं होत. तशात मासे पकडताना हुकाची टोके अडकून त्याला

लहान लहान छिद्रे पडली. पण ती जेव्हा चागली मोठी दिसू लागली तेव्हा मात्र आमचे धाबेच दणाणले.

शिडाचे कापड समुद्रावरील झंझावाती वाऱ्याना टक्कर देऊन थकले होते. पाणी उपसण्याचे पपही आता काम करीनासे झाले होते. दोरखडेही थकल्या भागल्या वृद्धासारखी दिसत होती.

या साऱ्या समस्यानी आम्हाला भावी सकटाची जणू अगोदरच वर्दी दिली होती. त्यातच समुद्र आपल उग्र रूप दाखवू लागला होता. त्यामुळे आम्हा सर्वांचे चेहरे भीतीने काळवडून गेले होते. सर्वजण डेकवर पहुडले होते. पण कोणीच एक दुसऱ्याशी बोलण्यास धजावत नव्हते.

'नीना' यावेळी समुद्रात ज्या ठिकाणी होते तेथून अवघ्या शभर मैलावर आफ्रिकेचा समुद्रकिनारा होता. आफ्रिकेचा किनारा लागताच आम्ही 'नीना' नागरून उभे करणार होतो.

अवघ्या १०० मैलाच अतर तोडल्यावर आम्ही एकदम केप ऑफ गुड होपजवळ येऊन पोचणार होतो. पण तेथे पोहचण्यासाठी अनुकूल हवामानाची व आमच्या नशिबाची जोड मिळायला हवी होती.

आम्ही जाणून बुजून या धाडशी मोहिमेवर निघालो होतो. कदाचित् भिऊन आम्हाला या मोहिमेतून अग काढून घेता आले असते पण तसे करण्यासाठी आम्ही मोहिमेवर निघालो नव्हतो.

मात्र एका शकेनं आम्हा सर्वांची मने ग्रासली होती. आम्हा सर्वांना सारख वाटत होत की, आपण कोलबसाप्रमाणेच जहाज व त्याच प्रकारची साधनसामुग्री घेऊन जरी मोहिमेवर निघालो असलो तरी आपल्याला यश मिळणार नाही !

सतरा दिवसातच आपल्या मोहिमेतील निम्मे अतर कोलबसाने कापले होते. आम्ही कोलबस ज्या मार्गाने गेला, त्याच मार्गाने चाललो होतो, पण कोलबसाच्या तुलनेने आम्ही अद्याप फारच मागे होतो.

स्पेनहून आम्ही जेव्हा या मोहिमेवर निघालो तेव्हा हजारो लोकानी आमचा जयजयकार करून 'प्रति कोलबस' म्हणून गौरवाने उल्लेख केला होता. आम्ही जाणून बुजून मोहिमेची ही जीवघेणी आपत्ती स्वतः-वर ओढवून घेतली होती. जयजयकार होत असताना आम्ही ही मोहीम पूर्ण करूच अस अभिवचन आम्ही स्पॅनिश जततेला दिल होत, तेव्हा मोहीम अर्धवट सोडून परत जायच तर स्पॅनिश जनतेला तोड दाखविणार तरी अस ? आमचे देशबाधव व जगातील लोक काय म्हणतील ? या विचारानेच आम्ही गागारून गेलो.

मनातला हा विचार दूर सारण्यासाठी मी डेकवर पडल्या पडल्या आकाशातील ताऱ्याचे निरीक्षण करून मन त्याकडे गुतविण्याचा प्रयत्न करू लागलो.

परतु अचानकपणेच माझ्या तोडून शब्द बाहेर पडले.

'मायकेल, माझ्यासाठी एक रमची बाटली आण !"

माझ्या उद्‌गाराने सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला. कारण रमच्या बाटल्या विशिष्ट अशा प्रसगीच वापराव्यात असा आमचा सकेत होता.

पण मनावरील ताण कमी करण्यासाठी सर्वांनाच रमची गरज भासू लागली होती. सर्वजण जहाजाच्या छोटचाशा केबिनमध्ये जमा झाले. मायकेलने रमची बाटली काढली व वाटणी सुरू केली. निराश झालेल्या व्यक्तीवर दारुचा लगेच पगडा बसतो. त्यावेळीही नेमके तसेच झाले काही मिनिटातच आरडाओरगीला सुरुवात झाली. मी मुद्दामच थोडी रम घेतली होती. त्यामुळे मी पुर्णपणे शुद्धीत होतो. जेव्हा सर्व लोक शात झाले तेव्हा सर्व लोकाना मी आपल्यापुढील सकटाची व प्रवासाची कल्पना दिली

आमच्या मोहिमेतील बहुतेक सर्वांना एकच चिंता लागून राहिली होती की, आम्ही आता निश्चित कोणत्या ठिकाणी आहोत ?

आमच्या मोहिमेत काही चागले दीर्घानुभवी नाविक होते. व्यापारी वारे अजूनपर्यंत का वाहात नाहीत ? हे एक रहस्यच बनल होत. त्याचप्रमाणे विरुद्ध दिशेने वाहणाऱ्या वाऱ्यामुळे आमचे 'नीना' जहाज मूळ ठिकाणापासून बरेच दूरवर भटकत गेले होते. थोडक्यात सांगावयाचे झाल्यास कोलंबसाच्या मार्गापासून ३०० मैल दूर दक्षिणेकडे आमचे जहाज होते.

जहाज सध्या मी चालवीत होतो. मी दूर भरकटत चाललेल जहाज मूळ ठिकाणावर आणावं म्हणून प्रयत्नाची शिकस्त करीत होतो पण जहाज मूळच्या मार्गावर कसं आणाव हेच मला समजत नव्हतं.

प्रवासातील अडीअडचणीची पुरेपूर कल्पना येण्यासाठी मी कोलबसाची सपूर्ण डायरी वाचून काढली होती. पण या वेळी मात्र नेमक काय कराव, हे काही सुचत नव्हत. अटलाटिक महासागरातून प्रवास करताना आमच्या इतकी आपत्ती कुणावरच ओढावली नसेल.

मी मायकेलकड नजर फिरवली. तो खरा तर व्यवसायान जनावराचा डॉक्टर होता. पण आमच्या मोहिमेत तो आमचा अन्नमत्री होता. तो कधी कधी अचूक मार्गदर्शनही करीत असे.

"मिस्टर मायकेल, आपल्याजवळ असलेला अन्नसाठा आपल्याला किती दिवस पुरेल ?"

मायकेल काहीच बोलला नाही. त्याने फक्त मान हलवली. काही क्षण थाबून तो म्हणाला,

"आपल्याला पाण्यासाठी काही वेळ केप ऑफ गुडहोपला थाबाव लागेल !"

जवळ जवळ निम्म्या लोकाचा त्याच्या या म्हणण्याला पाठिंबा होता. मोहिमेतील अर्ध्या लोकाना मोहीम सोडून द्यावी व जमिनीवर उतरावे असे वाटत होते, तर काही लोकांचा येईल त्या परिस्थितीला तोड देऊन मोहीम पूर्ण करण्याचा निर्धार होता.

आमच्यात दोन तट पडल्याने कोणता निर्णय घ्यायचा हा प्रश्न होता. तेव्हा मी विचारले,

"नाणे उडवून निर्णय घ्यायचा का ?"

त्यावर लगेच काहीजण जवळ जवळ ओरडलेच,

"हे आम्हाला मान्य नाही. जर निर्णय आमच्या विरुद्ध लागला तर आमच्यावर प्रवासात तडफडून मरण्याची पाळी येईल!"

"*मग आपण असं करू या की, या* विषयावर गुप्त मतदान घेऊ !"

हा विचार सर्वांनीच उचलून धरला.

लगेच गुप्त मतदान घेण्यात आले. मी जेव्हा मते मोजू लागलो तेव्हा सर्वच्या सर्व लोकानी मोहीम चालू ठेवण्याच्या बाजूने मते

दिली होती. हे पाहून मलाही आश्चर्य वाटलं.

२६ ऑक्टोबर १९६२ या दिवशी रम घेऊन आम्ही सर्वांनी उपाशी पोटीच अटलांटिक महासागर पार करण्याचा निर्णय केला. आमचा मोहिमेतील सतरावा दिवस होता. कारण या अगोदर आलेल्या अनेक सकटाना आम्ही निकराने तोड देऊन याच दिवशी मोहीम पूर्ण करण्याचा निश्चय केला होता.

गुप्त मतदान होऊन काही वेळ उलटतो न उलटतो तोच वादळाचा जोरदार तडाखा 'नीना' जहाजाला बसला आणि हा वादळाचा तडाखा चागला आठवडाभर टिकून होता.

या मोहिमेतील एकाही नाविकाला या नोव्हेंबरचा विसर पडणार नाही. आमच्या मोहिमेचा तेविसावा दिवस होता तो.

त्या दिवशी सकाळीच जोराचा पाऊस सुरू झाला. वादळाचा नगा नाच सुरू झाला. त्यामुळे समुद्राला केव्हा तुफान येईल, याचा नेम नव्हता. ज्या व्यापारी वाऱ्याची आम्ही इतके दिवस प्रतीक्षा करीत होतो, ते व्यापारी वारे आता सुसाट वेगाने वाहू लागले होते. ते वारे जिकडे ओढून नेतील तिकडे आमचे जहाज भरकटत चालले होते एवढे मात्र खरे की, वाऱ्याच्या कृपेमुळे २४ तासात जहाजाने ११७ मैलाचे अतर तोडले होते. आतापर्यंतच्या प्रवासातील हा एक उच्चाकच होता.

रात्र पसरू लागली. त्या वेळी आकाश ढगानी झाकळून गेल होत. पावसाला सुरुवात झाली. प्रथम साधारण आणि नतर मात्र मुसळधार पाऊस सुरू झाला. समुद्राने अक्राळविक्राळ रूप धारण केले वाऱ्याने थैमान घातले शिडाला जोराचे हेलकावे बसून त्याचे कापड फाटू लागले. जहाजाचा वरचा भाग वाऱ्याने व पावसाने झोडपून काढायला सुरुवात केली तर खालचा भाग समुद्राच्या लाटा जोरदार तडाखा देऊन झोडपून काढू लागल्या जहाजाचे दोर त्या तडाख्यात तुटून समुद्राच्या लाटाबरोबर वाहून जाऊ लागले. वाऱ्यामुळे जहाजाचा वेग वाढला व तो सहा नॉटस्‌वर जाऊन थडकला. आम्ही जहाजातून प्रवास करीत आहोत की, विमानातून असा सभ्रम आम्हाला पडला.

समोरच्या आपत्तीला तोड देण्याची शक्ती आमच्या जहाजातही नव्हती. व आमच्यातही नव्हती. आणि आताचा प्रकार म्हणजे या नतर येणाऱ्या भयानक तुफानाची पूर्व सूचनाच होती.

जहाजावरचे आमचे नियत्रण पूर्णपणे सुटले होते. कारण या भयकर वादळात जहाजाचे सचालन ही कल्पनाच अशक्यप्राय होती. तरी देखील आम्ही जहाजावर नियत्रण ठेवण्याचा प्रयत्न सोडून दिला नाही. प्रत्येकजण आळीपाळीचे प्रयत्न करीतच होता. रात्री अकरा वाजता माझ्यावर पाळी आली. प्रथम जहाजाच्या वेगाचा मी अदाज केला. त्यावेळी जहाजाचा वेग सात नॉटसच्या जवळपास होता. जहाजाचा वेग रोखण्यासाठी मी त्याला पश्चिमेकडे वळविले. पण जहाज पुन्हा मूळ मार्गावर येत होते. माझ्या प्रयत्नाला यश येण्याची काही लक्षणे दिसत नव्हती. त्यामुळे आजची रात्र ही आपल्या जीवनातील शेवटचीच रात्र अस वाटायला लागल.

थोडीशी आशा होती. वाटत होत की, दिवस उजाडल्यावर तुफान कमी होईल. पण दिवस उगवल्यावर देखील तुफान कमी होण्याऐवजी वाढू लागले. जहाजाचे शीड आत्मसमर्पणाच्या तयारीला लागले होते. खवळलेला सागर 'नीना' जहाजाला व त्यावरील आम्हा नाविकाना गिळकृत करण्यासाठी आसुसलेला होता.

मायकेल व मोनोलो आता जहाजावर नियत्रण ठेवण्याचा प्रयत्न करीत होते. पण समुद्राच्या तडाखेबाज लाटामुळे धडाधड खाली कोसळत होते, त्याच्या मदतीसाठी लाटाचे तडाखे चकवीत चकवीत मी वरच्या डेकवर पोहचलो. तेथे जहाजाचा कप्तान कार्लोस एटायो एखाद्या पुतळ्यासारखा उभा असलेला दिसला. तो टक लावून समोरचे ते तुफान पहात होता. त्याला अस पुतळ्यासारख उभ राहिलेल पाहून मी जागच्या जागीच उभा राहिलो.

काही क्षणच मी तेथे स्तब्ध उभा होतो. मी ओरडूनच म्हणालो, 'कार्लोस, आपल्याला पाल उतरायला हव !'

कारण जहाजाला त्याचा त्यावेळी काहीच उपयोग होत नव्हता. तर ते वाऱ्याबरोबर भरकटत चालले होते. दर मिनिटाला लाटाचे जहाजाला बसणारे जोरजार तडाखे वाढतच होते. त्यामुळे आमच्या मनातील भयही मिनिटा मिनटाला वाढतच चालले होते.

जे काम काल रात्री मला करता आलं नाही ते आज निसर्ग करू लागला व जहाज पश्चिमेकडे झुकू लागले. शिडात वारा घुसल्यामुळे आम्ही पाल उतरवू शकलो नव्हतो. कारण तसे करताना शिडाचे कापड फाटण्याचीच जास्त शक्यता होती.

आमचे जहाज अतिवेगानेच पुढे पुढे चालले होते जहाजाचा वेग आता दहा नॉटसवर गेला होता. या वेगामुळे कोणत्या क्षणी जहाजाचा विध्वस होईल हे सागणे कठीण होते आणि आम्हीही वेगाला प्रतिबध करण्यात असमर्थ ठरलो होतो.

आता आणखी एक विचित्र प्रसग घडला. चोहोबाजूनी शिडात वारा शिरून एखाद्या धनुष्याप्रमाणे त्याची अवस्था झाली व त्यामुळे एक विचित्र सूर उमटू लागला. तो मृत्यु सगीतातील सूर होता की, काय कुणास ठाऊक.

समुद्रावरील तुफानाचा जोर कमी न होता वाढतच होता. त्यातच गाराच्या पावसाने भर घातली व गाराचा मारा सहन करता करता पुरेवाट झाली. समुद्रावरील भयानक तुफानाची वर्णने आतापर्यंत मी अनेक पुस्तकांमधून वाचली होती. पण तो प्रसग आता प्रत्यक्षच अनुभवण्यास मिळाला व अगावर शहारेच आले. तुफान चारी दिशानी आम्हाला झोडपून काढीत होते वाऱ्याचा वेग साठ ते सत्तर नॉटसच्या दरम्यान होता. सर्व दोर कापून डेकवर टाकले होते त्यामुळे डेकवर नीट चालता देखील येत नव्हते.

सागरापुढे 'नीना' ने आणि आम्ही सर्वांनी हात टेकले होते, तरी समुद्राचे उग्र स्वरूप अद्याप तरी कमी झाले नव्हते. समुद्राच्या लाटांनी तर आकाशाला भिडण्याचीच चढाओढ आरभिली होती. आकाशाला भिडणाऱ्या त्या विशालकाय लाटा वरच्यावर एकमेकीना टकरून भयानक आवाज काढीत होत्या. त्यात आमचे जहाज लाटेवर आरुढ होऊन अगदी वर जात होते तर दुसऱ्याच क्षणी पाण्याच्या खोल दरीत जाऊन कोसळत होते. कधी कधी या लाटा चाळीसपन्नास फुटापर्यंत वर उठत होत्या.

ज्यावेळी ज्वालामुखीचा उद्रेक व्हावा तशा समुद्राच्या लाटा वर उसळत होत्या. आणि केरकचऱ्यासारख्या आम्हाला दूर ढकलीत होत्या. हा प्रकार सतत बरेच दिवसपर्यंत चालला होता.

एके दिवशी मात्र त्या भयकर तुफानाची तीव्रता आपोआपच कमी व्हायला लागली. वाऱ्याचा वेग आता तीस-चाळीस नॉट्सच्या दरम्यान होता. एवढ मात्र खर की, 'नीना' हे इवलेसे जहाज निसर्गाच्या साऱ्या क्रूरतेपुढे टक्कर देत शाबूत राहिलं होतं.

जहाजाचा कर्ण मात्र जवळजवळ दूर होण्याच्या मार्गावर होता. त्याची दुरुस्ती करायची म्हणजे पाण्याच्या व जहाजाच्याखाली जायला हवे. डागडुजी करण्यासाठी माझ्याजवळ असलेल्या हत्यारानाही गज चढला होता. मोहिमेवर निघतांना पहिल्या कोलबसाच्या वेळचीच म्हणजे पधराव्या शतकातीलच हत्यारे आम्ही मुद्दाम बनवून घेतली होती. इतक्या अडचणी असल्या तरी जहाजाची डागडुजी करणे आवश्यक होते; म्हणून मीच डागडुजी करण्यासाठी पाण्यात उतरलो. जहाजाच्या खालच्या बाजूला चिकटून बसलेल्या समुद्रातील कीटाणूंना दूर सारल, पण शार्क मासे माझ्याकडे वरच्यावर माझ्या शरिरातील गरम रक्तावर ताव मारण्यासाठी येत होते. त्याना दूर सारीत मी डागडुजी करीत होतो.

इतक्यात एक दहा फुटी शार्क मासा माझ्याच रोखाने येत असलेला दिसला त्या माशापुढे एक छोटा मासा येत होता. त्याने माझ्या डोक्यावरून चक्कर मारली. मी त्या छोट्या माशाकडे दुर्लक्ष केल. पण त्याने त्याचा चागलाच फायदा उठविला. त्याने डोक्यावरून माझ्या पायाकडे मुळकी मारली व पायाला घट्टपणे चिकटून बसला व रक्त शोषण करू लागला त्याला मी जोरात दूर ढकलल. मोठा शार्क मासा माझ्यापासून अवघ्या वीस फुटावर असावा. मात्र ड्रीलिंग करताना माझं सार लक्ष त्याच्याकडे होत.

दुसऱ्या दिवशी तुफान जरी पूर्णपणे शमल नव्हत, तरी त्याचा वेग मात्र बराचसा कमी झाला होता. कर्ण मात्र अजूनपर्यंत पूर्णावस्थेला आला नव्हता.

आम्ही पश्चिमेच्या रोखाने आमचा प्रवास चालू ठेवला होता. ते भयकर तुफान आता एकदम शात झाले होते. तुफानामुळे उरलेली दारूही नष्ट झाली होती. तहान भागविण्यासाठी आम्ही समुद्राचे पाणी पीत होतो. पण सुदैवाने काही वाईट परिणाम झाला नाही.

एक परिणाम झाला. एकदा वेडाचा झटका आल्याप्रमाणे आमच्यातल्या एकाने समुद्रात उडी टाकली. पण आम्ही लगेच उड्या टाकून त्याला वाचविले.

जीव वाचविण्यासाठी आम्ही मासे व समुद्रातील गवतावर गुजराण करीत होतो.

'नीना' हे पधराव्या शतकात कोलबसाने वापरलेल्या जहाजाची प्रतिमाच होती. त्यामुळे बाह्यजगाशी सपर्क स्थापित करणारी कोणतीच अत्याधुनिक यत्रसामुग्री त्यावर बसविलेली नव्हती. त्यामुळे आमच्या जहाजाला कुठेतरी जलसमाधीच मिळाली असावी असा बाह्य जगावर समज झाला होता. पोर्टोरिकोपासून ७०० मैलावर नौदलाच्या एका जहाजाने आम्हाला पाहिले आणि आम्ही जिवत असल्याचे वृत्त सबधित अधिकारीवर्गाला कळविले.

नतर परत एकदा पहिल्यापेक्षा भयकर अशा तुफानात आम्ही सापडलो. पण मृत्युशी सामना करीत आम्ही 'नीना'सह सर्व सहीसलामत बाहेर पडलो

शेवटी साठ दिवसाच्या प्रवासानतर आम्ही अमेरिकेला येऊन पोहोचलो. कोलबसाप्रमाणेच दुसरा दिव्य प्रवास यशस्वी केल्याबद्दल स्पेन सरकारने आमचा सत्कार केला.

पहिल्या कोलबसाने ३३०० मैलाचा प्रवास छत्तीस दिवसात केला होता. तर आम्हाला तितकाच हा प्रवास करायला साठ दिवस लागले.

अशा या धाडशी मोहिमेचे विस्मरण आम्हाला मरेपर्यंत तरी होणार नाही हे मात्र खास ! ☐ ☐


पुरंदऱ्यांचा सरकारवाडा

ब. मो. पुरंदरे

किमत सात रुपये

राजहंस प्रकाशन पुणे ३०

शनवारवाड्यातील शमादान

ब. मो. पुरंदरे

किमत साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन पुणे ३०

# मुंबई भ्रष्टाचार विद्यापीठ : पृष्ठ १२ वरून

वगैरेवर खर्चण्यात आले... ह्यातला ऐकवण्याजोगा किस्सा, ह्या क्लब हाऊसच्या सभागाराचा आहे. हे सभागृह, क्लब हाऊसच्या शेवटच्या मजल्यावर आहे. तिथे सभागृह वातानुकूलित करण्यासाठी ७५ अश्वशक्तीची भली मोठी मशीन्स चवथ्या माळ्यावर बसवली गेली. काही तज्ञाचा सल्ला धुडकावून लावून. आर्किटेक्टच्या अर्ध्या कच्च्या ज्ञानावर अवलंबून राहून. साहाजिकच मशीन्स चवथ्या माळ्यावर बसवताच संपूर्ण बांधकाम गदगदू लागले. भिंतीना चिरे पडू लागले. छप्पर गळू लागले. साहाजिकच मशीन्स तळमाळ्यावर हलवणे भाग पडले. ह्यावर निष्कारण खर्च विद्यापीठाला सोसावा लागला तो सव्वादोन लाखाचा! पुढची गमत ही की, ही एअर कंडिशनर्स खाली हलविल्यावर नवीन डोकेदुखी सुरू झाली. इंजिन्स-मध्ये बिघाड होऊन खर्च तर वाढलाच, पण तळमजल्यावरून चौथ्या मजल्यापर्यंत एअरकंडिशनीगसाठी आवश्यक तो गॅस खेळवणे फारच खर्चिक होऊन बसले. परिणामतः गेल्या ९।१० वर्षात ह्या एअर कंडिशनीग मशीन्सनी फक्त १२०० तास (५० दिवस) काम दिले. मात्र त्यांची निगा राखण्यासाठी दरमहा अडीच हजार रुपये तेवढे खर्च होत राहिले (१९७३ पासून ही रक्कम ३५०० रुपये महिना एवढी आहे : ADM / M / 26220 वा 28–12–73)...

ह्या खर्च हिशोबात घेतला तर क्लबहाऊसवरचा खर्च मूळच्या ९,८५,००० वरून थेट १९,१०,००० पर्यंत जाऊन थडकतो! प्रत्यक्षात व्हायला किती हवा? जेमतेम दहा लाखाच्या आसपास... खुद्द सभागृहाचा विचार केला तर, मूळ अदाजिक रक्कम व प्रत्यक्ष खर्च ह्याच्यातली तफावत आणखीनच स्पष्ट दिसून येईल. हे दोन्ही आकडे आहेत अनुक्रमे १,६३,६०० रुपये आणि रुपये ७,२९,५००|–

मी वर म्हटल्याप्रमाणे उदाहरणे देत सुटलो तर 'माणूस'चे दहा अंक देखील पुरणार नाहीत. ग्रथराजच त्यासाठी आवश्यक ठरेल. त्यामुळे ते इथे शक्य नाही. म्हणूनच वानगी दाखल ही एक-दोन उदाहरणे मी इथे उद्धृत केलेली आहे. त्यावरून, विद्यापीठीय बांधकामांच्या बाबतीत, खर्चात कशी उधळपट्टी झालेली आहे हे सहजी कळून येईल. वर उल्लेखिलेल्या, एकूण, बावीस-पचवीस लाखाच्या कामातच, दहा एक लाखाचा अवाजवी, असमर्थनीय खर्च आहे. हा पैसा ह्या ना त्या मार्गाने, ह्या कामाशी संबधित अधिकारी, कत्राटदार वगैरे व्यक्तीमध्ये विखुरला गेला आहे असा स्पष्ट सशय आहे. अफरातफर, अफरातफर ती हीच! ह्याच हिशोबाने, अडीच कोटीच्या कामात किमान कोटीपर्यंतची अफरातफर असावी असे अदाज आहेत. तसे उघड आरोप होताहेत. दहा दहा वर्षांचे हिशेब दाखवून देऊन आरोप केले जात आहेत. सदस्य, कर्मचारी ह्याना ज्या गोष्टीचा वास येतो, जो सशय येतो, त्यातून ते जे आरोप करतात, त्यांची साधी गधवार्ताही विद्यापिठीय कामकाजाशी रोजचा जवळून सबध येणाऱ्या व्यक्तीना असणार नाही हे सभवत नाही. कुलगुरू टोपे, रजिस्ट्रार चिदम्बरम्, असि. रजिस्ट्रार श्री. मणीलाल धोलकिया (हे गृहस्थ नॉन मॅट्रिक आहेत. युनिव्हर्सिटीच्या नियमानुसार ह्या पदावरचा गृहस्थ किमान पदवीधर असावा अशी अपेक्षा आहे!) वगैरेना ह्या गोष्टी कळत नाहीत हे सभवत नाही. तीच कथा शिक्षणमंत्र्याची! कारण त्याचे चिदम्बरम् साहेबाशी घनिष्ट सबध आहेत. तेव्हा ह्या सर्व मडळीना विद्यापीठात चालू असलेल्या गैरप्रकाराची माहिती नाही म्हटले तरी किमान आरोपाची कल्पना तरी असेलच! तरीही ही सारी मडळी होणाऱ्या मोठमोठाल्या आरोपाबाबत नकारही घोषित न करता गप्प बसतात, ह्यात काही त्यानबाची मेख तर नाही ना?

...ह्या मडळीना अशी चौकशी नको असली तर, शासनाने अशी चौकशी करण्याबाबत पुढाकार घ्यावा. शासनही त्याबाबत, काही 'तशा' कारणामुळे गप्प राहात असेल तर मात्र विद्यार्थी, कर्मचारी, प्राध्यापक, पालक व इतर लोकानी ह्याबाबतीत पाऊल उचलायला पाहिजे. तशीच वेळ आल्यास व सरकारने निगरगट्ट मौन पत्करल्यास, जनतेने स्वत:चे न्यायालय उभारून, मुंबईच्या सार्वजनिक जीवनाला कीड लावू पाहाणाऱ्या, उद्याच्या नागरिकाचे जीवन भ्रष्टाचाराने सडवून टाकू पाहाणाऱ्या ह्या विद्यापिठीय गैरकारभाराची कसून छाननी केली पाहिजे. सरकारच्या आपमतलबी मौनाचा भग करून, सरकार, विद्यापीठातले हितसबधी ह्याचा बुरखा टराटरा फाडला पाहिजे! सरकारने वाढवून ठेवलेल्या व आता विद्यापीठे पोशीत असलेल्या भ्रष्टाचाराला सुरुग लावण्याचा जनता न्यायालये हाच अशा परिस्थितीत एकमात्र उपाय ठरतो... ◻

( जादा खर्चाचा तपशील दाखवणारा तक्ता पृष्ठ २३ वर )

## स्फोट तिसरा

### किमतारी बिल्डिंग, परीक्षा विभाग, विद्यापीठ प्रेस, मेन्टेनन्स वगैरे वगैरे....

## काही उल्लेखनीय इमारतींचे खर्चाचे तपशील, अंदाजे जादा खर्च वगैरे

( सर्व आकडे रुपयामध्ये )

| इमारतीचे नाव | टेंडरनुसार रक्कम | किमान टेंडर रक्कम | वाढीव मंजूर खर्च | प्रत्यक्ष खर्च | संदर्भ | तज्ञांनी केलेल्या पाहाणीनुसार खर्च | जादा खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. व्ही. सी. लॉज | १,०६,४९५ | १,०१,६८४ | १,७९,००० | १,७५,२९७ | BC 23/11/67(4) | ५०,००० | १,२५,००० |
| २. „ „ (सॅनिटेशन, इलेक्ट्रिसिटी, एअरकंडि ) | ५०,२०० | ४०,४०० | ७४,३०० | १,४५,००० | BC 7/1/67(10)<br>FEAC 14/6/67(10)<br>FEAC 14/6/67(53) | ७०,००० | ७५,००० |
| ३. क्लब हाऊस | ९,८५,४३३ | ८,५२,३०० | ९,८५,४३३ | १९,१०,००० | BC 14/3/66(3)<br>BC 26/2/64<br>BG 24/3/74 (2b)<br>BC 18/2/72(12) | १०,००० | ९;१०,००० |
| ४. आतरराष्ट्रीय विद्यार्थी वसती गृह ह्यासाठीचा सपूर्ण खर्च | १२,८१,८९२ (दोन विभागासाठी) | १०,७८,७०० (मे. हरिभाई देसाई) | ११,३७,४१५ (फक्त एकच विभाग पूर्ण झाला) | १०,३७,४१५<br>१९,००,००० | BC 7/1/74(16) | ६,००,०००<br>११,००,००० | ४;३७,०००<br>८,००,००० |
| ५. यू डी. सी. टी. स्टाफ क्वार्टर्स / होस्टेल | ४,५६ ७१२ (मे धनजीशॉ भेड-वार आणि कपनी ) | ४,५६,७१२ | ९,८४,४८४ ( मे. हरिभाई देसाई आणि कपनी ) | ११,७९,३५२ ( मे. हरिभाई देसाई आणि क.)* | BC 1/5/59(3)<br>BC 8/7/60(3) | ५,००,००० | ६,७९,००० |
| ६. रेक्लेमेशन होस्टेल | ९,१९,६२७ | ९,१९,६२७ | — | २२,३०,५८२ | BC 8/7/68(1)<br>VC 2/1/67<br>BC 29/12/71<br>CE | ११,००,००० | ११,००,००० |
| ७. किमतारी बिल्डिंग (दुरुस्ती) | ७९,८३५ | — | — | ५०,८३५ (अपूर्ण) | — | १५,००० | ३५,००० |
| ८. विद्यानगरी सायन्स ब्लॉक | २०,७७,००० ( मे. हरिभाई देसाई ) | २०,७७,००० (मे हरिभाई देसाई) | २८,३२,००० | ३२,३२,००० | SR 23/2/74(34-9)<br>BC 7/1/74(2) | २०,००,००० | १२,३२,००० |
| ९. ह्युमॅनिटीज बिल्डिंग | ८,४८,००० | ८,४२,००० | १६,४८,००० | २१,००,७७४ | BC 18/2/72(6) | १४,००,००० | ७,००,००० |
| १०. लेक्चर्स हॉल | ८,०३,००० मे. हरिभाई देसाई कं. | ६,७६,००० मे. हरिभाई देसाई कं. | ९,४१,००० | ११,६३,००० | VC 19/7/71<br>3/8/71 | ७,००,००० | ४,६३,००० |

* ह्या ठिकाणी मूळ कमी किंमतीचे स्वीकारलेल टेडर मागे ठेवून, 'हरिभाई देसाई क.'चे नवीन टेंडर मजूर करण्यात आले ! कारण ???

# बँक एकांकिका स्पर्धा स्वागतार्ह उपक्रम

दत्ता श्री. टोळ

पी. डी. ए. नाटयसंस्थेतर्फे पुणे आंतरबँक एकांकिका स्पर्धेचे हे दुसरे वर्ष. वर्ष दुसरे असले तरी स्पर्धक बँकांची संख्या यंदा गतवर्षीच्या मानाने एकने कमी. शालेय, औद्योगिक, कामगार व हौशी रंगभूमीवरील स्पर्धांमध्ये प्रतिवर्षी स्पृहणीय प्रगती होत असता बँकस्पर्धा कमी का? ह्या प्रश्नाचे उत्तर भालबा केळकर ह्यांनी वृत्तपत्रप्रतिनिधींना दिले बँक कर्मचाऱ्यांच्या बदल्या होतात. पुण्यात सर्व बँकांची हेडऑफिसेस नाहीत इ. कारणे त्यांनी सांगितली. ती सर्व विचारात घेऊन स्पर्धक संख्या रोडावल्याची कारणमीमांसा पटली. शिवाय संख्येने कमी परंतु गुणवत्तेने निश्चितच गतवर्षीपेक्षा अधिक चांगले रंगभूमीवर पाहायला मिळाले. तेव्हा बँक एकांकिका स्पर्धेचा हा स्वागतार्ह उपक्रम निश्चितपणे चांगला रुजेल याची खात्री पटली. स्पर्धक व परीक्षक यांच्या विचारांची देवाणघेवाण, एखादे शिबीर या कामी उपयोगी ठरेल. त्या दृष्टीने पी. डी. ए. प्रयत्नशील राहील ही खात्री.

स्पर्धेच्या पहिल्या दिवशी बँक ऑफ इंडिया स्पोर्टस क्लबने 'जनावर' ही एकांकिका सादर केली. पुरुषोत्तम करंडक स्पर्धेत 'जनावर' व 'बळी' ह्या दोन्ही एकांकिकांना यश लाभले ते आजचे प्रसिद्ध नट दिग्दर्शक जब्बार पटेल यांचेमुळे, सहाजिकच त्यांनी सादर केलेल्या प्रयोगाशी ह्या प्रयोगाची तुलना होणे स्वाभाविक आहे

प्रत्येक माणसात जनावर, जनावराची वृत्ती कुठे तरी दडलेली असते मध्यम वर्गीय, पांढरपेशे मुखवटे घालून हिंडतात पोपट हे त्यांच्या संथ आयुष्याचे द्योतक. संसारात बोअर झालेल्या ह्या सामान्य माणसाचा मुखवटा फाडला तर ती माणसे कशी क्रूर जनावराप्रमाणे वागतात हे लेखक श. ना. नवरे ह्यांनी एकांकिकेत सुरेखपणे रेखाटले आहे

पुस्तकाचा एक दुकानदार, स्वभावाने गरीब. वर्षानुवर्षे एकाच बाकावर येऊन फुरसतीच्या वेळी पुस्तक वाचत बसायचा. ज्याला आयुष्यात सदैव हालअपेष्टा, कामजीवनाचे विकृत अनुभव उपभोगावे लागले असा इसम योगायोगाने त्याला त्या बाकाजवळ भेटतो. ह्या माणसाचे सारे जीवन भन्नाट. त्याच्या तोंडून लेखक जीवनाबद्दल भाष्य करतो. हा दुसरा इसम दुकानदाराचा स्वाभिमान डिवचतो. त्यातून त्या दुसऱ्या इसमाचा खून होतो ही एकांकिकेची कथा. पहिला इसम दुकानदाराच्या भूमिकेत अजित सातभाई चांगले समरस झाले होते. ते बेअरिंग त्यांनी अखेरपर्यंत टिकवले नाही. दुसरा इसम म्हणून विनायक मुंगी यांचा अभिनय कृत्रिम, हास्य फार नाटकी वाटले. एकूण प्रयोग मात्र छान झाला वातावरणनिर्मितीसाठी संगिताचा वापर आवश्यक होता.

ह्याच दिवशी दुसरी एकांकिका होती 'एक तुकडा' बहुधा ही लेखन स्पर्धेत दाखल झालेली एकुलती एक एकांकिका. लेखक, दिग्दर्शक ह्या श्रेयनामावलीत श्रीनिवास भणगे ह्यांचे नाव होते. ह्या गुणी कलाकाराने गतवर्षी लेखन, दिग्दर्शन, अभिनय व त्यांनी दिग्दर्शित केलेल्या एकांकिकेस पहिले पारितोषक मिळवलेले. साहाजिकच त्यांचेकडून फार मोठी अपेक्षा होती परंतु ह्या एकांकिके पुरते नमूद करणे झाल्यास पदरी निराशा पडली. भाकरीच्या एका तुकडयासाठी माणूस काय करेल, किती खालच्या थराला जाऊ शकेल ह्याला परिसीमा नसते हा एकांकिकेचा विषय चांगला परंतु लांबण असलेल्या पुनरावृत्तीच्या संवादांमुळे व गतीशून्यता यामुळे प्रयोग फसला.

ह्या एकांकिकेची जमेची बाजू म्हणजे रोहिणी ओक हिची सोनीची भूमिका. झोपडपट्टीतील तरुणीचे यथार्थ दर्शन अल्काझीच्या ह्या शिष्येने समर्थपणे घडवले. आठवण आली 'गुरु' नाटकातील उषा कलवागच्या भूमिकेची. तिच्या भावाची–झिप्र्याची भूमिका करणारे गजानन खळदकरही ठीक होते. परंतु अविनाश देशमुखांचा म्हातारा, म्हातारा वाटलाच नाही.

स्पर्धेचा दुसरा दिवस. सादर झाल्या दोन एकांकिका. दररोज दोन (अपवाद अखेरच्या दिवसाचा. ह्या दिवशी तीन एकांकिका होत्या) अथवा जास्तीत जास्त तीनच एकांकिका सादर झाल्या. हे सुखावह होते. प्रेक्षक मुक्तपणे सर्व एकांकिकांचा आनंद घेऊ शकत होते.

दुसऱ्या दिवशी रत्नाकर मतकरी लिखित 'सत्य' एकांकिका सेंट्रल बँकेने सादर केली. प्रेयसीची वाट पहाणारा एक प्रेमी व वेश्येची वाट पहाणारा एक इसम योगायोगाने सार्वजनिक रस्त्यावरील एकाच खांबाजवळ उभे असतात. प्रेयसीची वाट पहाणारा प्रेमिकाच्या प्रेमाबद्दलच्या कल्पना रमणीय असणे स्वाभाविक. वेश्येची वाट पहाणारा हा केवळ व्यवहारी, सर्व गोष्टी पैं-पैशात मोजणारा. दोघात साम्य फक्त दोघे वाट पहाणारे एवढेच., सत्य हे काही वेळा कल्पनेपेक्षा किती भयानक असू शकते हे मोठ्या नाटयपूर्ण पद्धतीने एकांकिकेत चितारले आहे. म्हणूनच एकांकिकेची अखेर सूचित केली जाते प्रेयसी व वेश्या म्हणून एकच स्त्री येण्याने. दोन भिन्न प्रवृत्तीचे प्रेमिक तोलामोलाच्या ताकदीने उभे करणे यावर यशाची मदार होती. वेश्येची वाट पहाणारा दुसरा इसम विश्वास गद्रेने चांगला दाखवला. परंतु प्रेयसीची वाट पहाणारा पहिला इसम दिलीप दिघे त्या दृष्टीने फिके पडले. त्यांचा अति नाजुकपणा, प्रसंगी विश्वासऐवजी विस्वास असे त्यांचे उच्चार खटकले

युनायटेड वेस्टर्न बँकेची 'नाही आसू नाही माया' ही विनोदी एकांकिका लेखनातील विनोदामुळे केवळ ठीक वाटली.

अखेरच्या दिवशी 'बळी' व 'कैद'चे प्रयोग छान झाले कैद ही एकपात्री एकांकिका. बँका, शाळा किंवा औद्योगिक स्पर्धेत अनेकांना आपल्या कलागुणांचे प्रदर्शन घडवता येईल, अशी संधी प्राप्त होईल अशा एकांकिका निवडल्या जाव्यात. 'कैद' मध्ये रंगमंचावर वावरते एकच व्यक्ती. अन्य चार नगण्य पात्रांचा ध्वनिमुद्रित आवाज काय तो वापरला जातो. श्रीनिवास भणगे ह्यांचा अभिनय दृष्ट लागण्यासारखा होता. सतत चाळीस मिनिटे हा कलावंत बोलत होता तरी एकदाही कंटाळवाणे तर वाटलेच नाही पण त्याच्या देखण्या अभिनयामुळे प्रेक्षक खुर्चीस खिळून होते. प्रकाशयोजना, नेपथ्य छान होते

बडोदा बँकेची 'बळी' ही चाकोरीबद्ध रहस्यमय कथावस्तू असलेली एकांकिका. नारायण पावळे ह्यांचे नेटके दिग्दर्शन लाभले. प्रयोग चांगला झाला सौ. शुभा जोशी (कमलाबाई) व बाळाजी देशपांडे (डॉक्टर) ह्यांच्या भूमिका चांगल्या झाल्या. बँक कर्मचाऱ्यात स्त्री कलावंतदेखील चांगल्या भूमिका करू शकतात हे प्रथम ह्या एकांकिकेतून आढळले. इतरांच्या भूमिका उल्लेखनीय नसल्या तरी सांघिक कामास पोषक ठराव्यात अशा होत्या एवढे म्हणता येईल.

बँक ऑफ इंडियाची 'चार दिवस' ही अनेक पात्रांची एकांकिका. जिथे कुणा एकाची भूमिका ही विशेष महत्वपूर्ण नसते तिथे एकांकिका आकार घेते सर्वांच्या एकसंध कामाच्या साह्याने. अशी ही एकांकिका. सौ प्रियंवदा जोगळेकर (शकू) ह्यांची उल्लेखनीय भूमिका एवढेच ह्या एकांकिकेबद्दल नमूद करता येईल.

असा आहे एकूण बँकस्पर्धेच्या यशापयशाचा थोडक्यात अहवाल. फार मोठे नसले तरी अपेक्षित समाधान लाभले. उपक्रम स्वागतार्ह आहे. पुण्यातील अन्य स्पर्धांप्रमाणे तो चांगला रुजेल ही खात्री. त्यासाठी स्पर्धकांच्या अडचणी दूर करून अधिकात अधिक स्पर्धक भाग घेतील ह्या दृष्टीने संयोजक प्रयत्नशील राहतील ही अपेक्षा ☐

। । । नजर । । ह. शि. खरात । । ।

# दोन इटालियन चित्रपट : चावट पण निरोगी

इटालियन चित्रपटात नववास्तवता आणणारा व्हिटोरिओ डिसिका हा प्राणी आणखी एका गोष्टीबद्दल प्रसिद्ध आहे आणि ती गोष्ट म्हणजे मिष्किल चावटपणा. त्याच्या चित्रपटातून जो अफलातून चावटपणा असतो तो प्रेक्षकाना पोट धरधरून हसवणारा असतो. त्याचप्रमाणे त्या चावटपणात सामाजिक बिगासोगाची जी धमाल खिल्ली उडविलेली असते ती माणसाला अतर्मुख केल्याशिवाय राहात नाही. आणि ही मिष्किल चावटपणाची परपरा अजूनही पुढे चालू असून उलट तिला अधिकच टोकदारपणा येत आहे. स्त्री-पुरुष सबध हा सनातन चावटपणाचा विषय आहे. सेक्स हा स्त्री-पुरुषाचा 'बुइक् पॉइंट' अतिशय टोकदार उपहासातून किंवा निर्भेळ विनोदातून माडण्यात इटालियन चित्रपटाइतके इतर भाषीय चित्रपट तितकेसे यशस्वी झाले नाहीत 'सेक्स' हा विषय हाताळणे मुळात तारेवरची कसरत असते. त्यात पुन्हा तो 'फार्सिकल व्हेन'मधून माडताना घाणेरडा होण्याची किंवा त्याला हीन अभिरुची येण्याची फारच मोठी शक्यता असते. ह्या दृष्टीने पाहता इटालियन चावट चित्रपटातून एक प्रकारचा निरोगीपणा आढळतो व उत्कृष्ट दर्जेदार चित्रपट म्हणूनही काही इटालियन चित्रपटाची गणना होते. अर्थात ह्यालाही काही अपवाद असतातच.

गेल्या आठवड्यात थोड्याच दिवसाच्या अतराने दोन असले चावट इटालियन चित्रपट बघावयास मिळाले. त्यापैकी 'द बर्डस, द बीज अ‍ॅन्ड द इटालियन्स' हा पिएर्तो गेर्मी ह्या कल्पक दिग्दर्शकाचा उत्कृष्ट चित्रपट होय. तर ग्रियानी ग्रिमाल्डी ह्या दिग्दर्शकाचा नावाप्रमाणेच उगीच ताणलेला 'व्हॉट हॅपन्स टू अ लॅटिन लव्हर ऑन हिज वेडिंग नाइट' हा सुमार चित्रपट होय.

## द बर्डस, द बीज अ‍ॅन्ड द इटालियन्स

हा चित्रपट म्हणजे एक गाव बारा भानगडी किंवा कोंबडीशिवाय उरूस नाही, अन् भानगडी शिवाय पुरुष नाही ह्याची बानगी देणारा. ह्या गावातील काही पुरुष मोठे चालू. एकापेक्षा एक लफडेबाज. वर स्वत च्या बायका असूनही परस्त्री अमृतासमान मानणारे. आपल्या दोस्ताच्या बायकोवरच डोळा ठेवणारा हा कपू. अर्थात त्याच्या बायकाही तशाच. त्याही पुरुषाप्रमाणेच लाईन मारण्यात पटाईत. बर ही चालू मडळी गावात प्रतिष्ठीत म्हणून जगत असतात. कोण डॉक्टर असतो, तर दुसरा दुकानदार. ह्या अशा असामीचा धदा म्हणजे (अर्थात स्वत चा व्यवसाय साभाळीत) गावभर लफडी करायची नाहीतर इतराची लफडी उघडकीस आणायची.

अशाच एका बड्या धेंडाच्या घरी ही मडळी पार्टीला जमतात. त्यातला एक इसम पक्का चालू. तो त्याच्या डॉक्टर मित्राला सागतो गेले काही दिवस झाले मी पुरुष म्हणून निकामी झालोय. मग काय, डॉक्टरला विश्वास वाटून 'धोका' नाही म्हणून डॉक्टर आपल्या बायकोला इतराच्या कचाटघातून सोडविण्यासाठी त्याच्याशी नाचायला लावतो. एवढेच नव्हे तर तिला घरी पोहचविण्यासाठीही त्याचीच नेमणूक करतो. इकडे पार्टीत धमाल चालू असते. अनेक व्यक्तीमत्वाचे व प्रसगाचे नमुने पाहायला मिळतात. नवरा आपल्याबरोबर नाचत नाही म्हणून हिस्टेरिआ होऊन भयानक कॅबेरे करणारी, तिला मुद्दाम डिवचण्यासाठी नाचणारी दुसरी, तर चमडी जाय पण दमडी न जाय अशा स्वभावाचा अत्यत चिकट परतु तितकाच बोअर करणारा एक दाडगा इसम, असे अनेक नमुने बघत असतानाचा हा तो चिकट प्राणी डॉक्टरला सागतो की तुझ्या बायकोबरोबर ज्याला पाठविलेस तो 'तसा' नाही. डॉक्टरला सशय येतो. तो घरी जातो. बघतो तर त्याचा मित्र 'बेडरूम'मध्ये दीनवाणा बसलेला. डॉक्टरला हसू फुटते. तो तसाच कावराबावरा होऊन जाऊ लागतो. आणि एकदम पिसाळल्यासारखा डॉक्टर त्याच्यावर तुटून पडतो कारण त्याच्या नपुसक नाटकाचा बोऱ्या त्याच्या आतील विजारीच्या लोंबत्या नाड्यानी वाजविलेला असतो. डॉक्टर दोघानाही खूप थोबाडतो. परतु शेवटी हे 'एटर्नल सिक्रेट' ठेवा म्हणून बजावतोही. आपल्या चिकट मित्राला ही भानगड कळू नये म्हणून त्याला सोबत म्हणून रात्रीचा पायी चालत त्याच्या घरी जातो. ही भानगड पेश करताना जे बारकावे दाखविले आहेत ते खरोखरच उत्कृष्ट दिग्दर्शनाचे नमुने आहेत.

दुसरी भानगड आहे एका दोन पोराच्या बिचाऱ्या बापाची. परतु तोंडाळ आणि भाडकुदळ बायकोला वैतागलेल्या व म्हणूनच एका सुदर तरुणीच्या प्रेमात पडलेल्या एका ससारी पुरुषाची. हा इसम बँकेतला एक कारकून. पण एका स्मार्ट पोरीवर फिदा. तो चोरून मग तिच्याबरोबर फिरू लागतो. पण गावातला कुटाळकपू त्याच्या बायकोला निनावी चिठ्ठी पाठवितात. बापरे! मग खवळलेली ती जहाबाज बाई जो तोफखाना सुरू करते की त्याला बाथरूममध्ये जाऊन कानात कापसाचे बोळे घालावे लागतात. ती त्याला मारतेही. परतु ह्याच्यात कोण सचारते कुणास ठाऊक? एक अशी बायकोला लगावतो की बायको पाणी मागते. हा घरातून बाहेर पडतो, तो मुक्तीच्या आनदाने त्या चालू मडळीना सागतो की मी मुक्त झालोय बायकोच्या कचाट्यातून. आणि मग उघडपणे तो त्या पोरीबरोबर फिरू लागतो. गावातील पाद्र्यापासून टारगट पोरापर्यंत ही गोष्ट कुणालाच पसत पडत नाही. मग हे प्रेमप्रकरण मिटविण्यासाठी ही मडळी असे काही एकेक उपाय योजतात की झक मारली अन प्रेम केले असे होऊन जाते. शेवटी वैतागून हा 'मजनू' इमारतीच्या आगाशीवरून उडी मारून आत्महत्या करण्याची धमकी देतो. खाली

सगळा गाव जमा. पोलीस त्याला झेलण्यासाठी खाली जाळे घेऊन उभे. डॉक्टर त्याला चार गोष्टी सांगतो. आणि हा बहाद्दर आत्महत्येचा विचार बदलतोही. तेवढ्यात त्याची बायको हाका मारीत येते. तिला बघताच महाशय सरळ देह झोकून देतात. पण पोलीस अलगद झेलतात. हॉस्पिटलमध्ये बायकोसकट सगळे भेटायला येतात. तेव्हा आलिया भोगाशी असावे सादर म्हणून पुन्हा कानात कापसाचे बोळे घालून मुकाट संसाराला लागतात. ही भानगड खरोखरच धमाल आहे. ह्यातील प्रत्येक प्रसंग पेश करताना दिग्दर्शकाने असे काही डोके लढविले आहे की आपण तर हसून बेजार होतो. बायकोबरोबर जेवतानाचा प्रसंग, बायकोची बडबड टाळण्यासाठी कानात बोळे घालणे, हॉटेलात पोरीला घेऊन गेल्यावर होणारी परवड, घरी चोरून रात्रीचे यावे व अंधारात चाचपडताना हात नेमका वाट बघत बसणाऱ्या बायकोच्या डोक्यावर पडणे, गावातल्या चालू कपूने निनावी पत्रे लिहिणे, टारगट पोरानी टर उडविणे, दारूच्या नशेत प्रेयसीच्या खिडकीखाली टाहो फोडणे व पोलीसव्हॅनमधून रवानगी होणे—अंगातील कपडे काढून आत्महत्येची तयारी करताना कुटाळकपूत नेमका जोडा फेकणे व त्यातील एकाने 'हू हॅज प्लेड धिस प्रॅक्टीकल जोक' म्हणून वर बघणे असे अनेक प्रसंग आहेत की ह्या भानगडीला फार्सची धमाल चव येते.

तिसरी भानगड आहे ह्याच चालू पुरुषाची. शहरात एक मस्त गावरान पोर येते आणि ही चालू मडळी आपल्या व्यवसायाचा चाणाक्षपणे उपयोग करून ह्या पोरीची मजा मारतात. तेही एकमेकाना फोन करून. अर्थात पोरगीही बिलदर. प्रत्येकाकडून एक एक वस्तू घेत त्याना मजा मारायला देते. पण घरी गेल्यावर बापाला सागते. बाप जाम दारू पिऊन जाब विचारायला येतो. हे लफडेबाज त्याला ओळख देत नाहीत. मग तो अखेरचा उपाय योजतो. आपली मुलगी १६ वर्षांची असून तिच्यावर ह्यानी बलात्कार केल्याचा खटला भरतो. मग ही चालू मडळी हादरतात वकिलातर्फे जज्जला बनवू पाहतात. पण 'तो म्हातारा' बधत नाही. अब्रू जायची पाळी येते. गावातले हे तथाकथित प्रतिष्ठित. शेवटी पैशाच्या रूपाने मोबदला देऊन हे प्रकरण मिटवायचे ठरते. त्यासाठी त्यातल्या एकाचीच बायको पैसे घेऊन त्या बापाकडे जाते. ही चालू मडळी गाडीत बाहेर थाबतात त्या पोरीचा बाप आत गोठ्यात असतो. ती त्याला ६० मिलियन्स मोबदला देते. पण हा तिला पाहून पेटतो आणि भलताच मोबदला घेतो. स्वत:चे कपडे झटकत ती ह्या चालू पुरुषांच्याकडे येते व तडजोड झाली म्हणून सागते. पुरुषमडळी खूश होऊन जाणार इतक्यात हा बेरका बाप मध्यस्थीला गेलेल्या बाईची 'ब्रेसियर' विसरली म्हणून द्यायला येतो आणि चालू पुरुष मडळीत लख्ख प्रकाश पडतो. ह्या भानगडीत गावरान पोरीची मजा मारतानाचे प्रसग फारच झकास दाखविले आहेत ह्या प्रसगातून दाखविलेली सूचकता लाजवाब आहे तसेच ती सँडल घेतानाचे 'व्हॉट इज युवर साइज' सारखे द्व्यर्थी सवादही आहेत. ते कळल्यास ह्या चावटपणाची लज्जत अधिकच वाढते. असा हा धमाल चावट चित्रपट. त्याच्या आयडियाबाज दिग्दर्शकाला आपण मानतो ह्या चित्रपटातील व्हेर्ना लिसी धरून साऱ्याचीच कामे इतकी जिवत वाटतात. त्याच्या सहज अभिनयाचं कौतुक करावे तेवढे थोडेच.

### व्हॉट हॅपन्स टू अ लॅटिन लव्हर ऑन हिज वेडिंग नाइट

'द बर्डस अॅन्ड द बीज' पेक्षा हा चित्रपट तसा धमाल वाटला नाही. मुळात हा चावट फार्स सुरुवात सोडली तर पुढे पकड घेत नाही व फारच सथ व विस्कळीत वाटतो. ह्या चित्रपटाची कथा-कल्पना तशी चागली होती. पण एकामागून एक जी वेगवान प्रसगाची धमाल घडावी लागते तिचा अभाव आढळतो. एका सभ्य तरुणाच्या ऐन मधुचंद्राच्या रात्री घाबरून त्याला मानसिक दुर्बलता येते. त्यामुळे सारी रात्र फुकट जाते. ह्याचा गावात बभ्रा होतो. त्यात त्याची सासू टपकणे, त्याने डॉक्टरला बोलावणे. त्याचा 'नर्व्हसनेस' घालविण्यासाठी अनेक उपाय योजणे व शेवटी दुसरी पोरगी पाठवून त्याची भीती घालविणे व मधुचंद्र सासूच्या मनासारखा साजरा होणे (म्हणजे फोनमधून थकल्याचे श्वास सासूने ऐकणे) अशी सुमार कथा आहे. ह्या चित्रपटाची सुरुवात चागली आहे.आईने आपल्या मुलीस 'जळलं तुझं कौमार्य—काही न भानगड करताच लग्न ठरविलंस' म्हणून समज देते. तसेच मधुचद्र सफल झाल्यावर जणू काय लढाई जिंकली अशा भावनेने सारे गाव आनदाने नाचणे ह्या कल्पना धमाल आहेत. लँडो बुझान्का आणि काटिया ख्रिश्चिना ह्याची कामे चागली आहेत. विशेषत लँडो बुझान्कामुळे हा चित्रपट बघावासा वाटतो. □ □

---

## हिंदी महासागरातील बड्या राष्ट्रांची स्पर्धा

पृष्ठ ८ वरून

आहेत. गेल्या वीस वर्षात अमेरिकेने ८ कोटी पौंडाची लष्करी मदत एथिओपियास केली. बादशहा हेले सेलासी यानी गेल्या वर्षी वॉशिंग्टनला भेट दिली व अमेरिकेकडून आणखी मदत मिळविण्याचा प्रयत्न केला पण त्यात यश आले नाही. कारण त्यावेळी सोमालियातील रशियन प्रभावाची भीती अमेरिकेस फारशी वाटत नव्हती. एथिओपियातील नव्या लष्करी राजवटीने या धोक्याकडे पुन: लक्ष वेधून लष्करी मदतीची मागणी केली आहे. एथिओपियाचे नवे सरसेनानी जनरल अमान अॅडम यानी आदिस-अबाबमधील अमेरिकन मदत गटाचे प्रमुख जनरल डोनाल्ड योव् याच्याशी केलेली बोलणी या दृष्टीने महत्त्वाची आहेत. रशियन आरमाराला ताबड्या समुद्रातून हिंदी महासागरात प्रवेश मिळविण्याच्या दृष्टीने सोमालियातील बरेबारा तळ रशियास महत्त्वाचा वाटतो. हिंदी महासागरातील ही स्पर्धा थांबविणे बड्या राष्ट्राच्याच हाती आहे पण सध्या तरी त्यांचा तसा विचार दिसत नाही.

□ □

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### दि. १० ते १६ ऑगस्ट ७४

### केंद्रीय मंत्र्यांच्या खात्यात बदल शक्य

भारताच्या मकर राशीला हा आठवडा तरी मंगळ व रवी प्रतिकूल आहेत. तसेच चंद्राचे भ्रमणदेखील फारसे अनुकूल नाही. त्यामुळे आर्थिक दृष्टया देशाची परिस्थिती आजच्यापेक्षा जास्त वाईट होईल व पंतप्रधान श्रीमती गांधी या लोकांच्या असंतोषाच्या जनक बनतील. मात्र त्या स्वतः कोणतीच जबाबदारी स्वीकारणार नाहीत व मंत्र्यांच्या काही खात्यात बदल करून 'बळीचा बोकड' बनवतील. मध्य प्रदेशात पुन्हा उलथापालथ होण्याची शक्यता आहे. बिहार राज्यात मुख्यमंत्री गफूर यांना जोरदार धक्के बसू लागतील. महाराष्ट्र मंत्रीमंडळात वाढ होण्याची शक्यता.

**मेष : विवाहाचा योग**

या आठवड्यात आपणास चंद्राचे बळ अनुकूल असेच आहे. रवी आठवडाभर सुखस्थानी आहे तर मंगळ पाचवा आहे. प्रामुख्याने विवाहाला हा आठवडा अनुकूल आहे. बरेच दिवस रेंगाळत असलेला विवाहाचा प्रश्न विवाह ठरून निर्णय होईल. सोमवारनंतर बेकारांच्या बाबतीत मोठीच अनुकुलता लाभेल. शेती, वाणिज्य, वैद्यकीय इंजिनियरिंग या क्षेत्रातील पदवीधरांना चांगल्या नोकऱ्या मिळतील. चालू नोकरीत मंगळवार ते गुरूवार या दरम्यान अनुकूल बदल घडेल. आजारी माणूस तब्येतीने सुधारेल. आर्थिक परिस्थिती समाधानकारक राहील. **महिलांस :** कुमारिकांचा प्रेमविवाह जुळेल, नोकरीत प्रमोशन. बोलणे कमी करा.

**वृषभ : अनपेक्षित अर्थलाभ**

सुखस्थानचा मंगळ थोडाफार मानसिक त्रास देणार असला तरी एकंदरीत रवी व या आठवड्यातील चंद्राची अनुकूलता आर्थिक दृष्टया तुम्हाला बराच लाभदायक ठरेल. नोकरी व तुमचा चालू कोणताही व्यवसाय यात नवे पर्व सुरू होईल. तुम्ही कलावंत असाल तर तुमच्या वाट्याला आलेली उपेक्षा संपणार आहे. नोकरीत थोडा अनुकूल बदल होईल. चालू कामातील त्रास कमी होईल. तुमच्या कर्तबगारीला नवे क्षेत्र उपलब्ध होईल. मित्रांचे सहकार्य मिळेल. प्रामुख्याने शनिवार ते बुधवार या दरम्यान तुमच्या आर्थिक स्थितीत अनुकूल बदल होईल. रेस लॉटरीत फायदा. **महिलांस :** माहेरहून पैसा येईल. नोकरीत प्रमोशन मिळेल.

**मिथून : जमिनींचा प्रश्न सुटेल**

एकदोन दिवसानंतर चंद्र अनुकूल होईल. रवी फक्त आठवडाच अनुकूल आहे. याचा तुम्ही फायदा घ्या. तुम्ही औषधी वस्तूंच्या उत्पादनाशी संबंधीत असाल तर तुम्हाला हा आठवडा सर्वच दृष्टीने अनुकूल आहे. सोमवार ते गुरूवार नोकरीत तुमच्या आशा-आकांक्षा सफल होतील किंवा तुमच्या महत्त्वाकाक्षांना चालना मिळेल. तुमच्या मनात वाहन घ्यायचे असेल तर ती तुमची इच्छा यावेळी पुरी होईल. आर्थिक प्रयत्न यशस्वी होतील. पत्रव्यवहारात मोठे यश मिळेल. नोकरीत प्रमोशन व बदलीचा विचार होईल. तुम्हाला जमीन विकत मिळू शकेल किंवा न्यायालयात अशा प्रकारचा तंटा असला तर तुम्हाला फायदा होईल. **महिलांस :** माहेरची मदत स्थावर रूपाने मिळेल. नोकरीत बदली.

**कर्क : चैन आवरा**

दुसरा मंगळ व आठवड्याचे पहिले एक दोन दिवस प्रतिकूल. चंद्र लक्षात घेता तुम्हाला खर्चावर काही तरी बंधन घालणे आवश्यक आहे. प्रामुख्याने चैनीकडे तुमचे झुकणारे मन आवरावे. आजार अगर तत्सम प्रकारचा अनपेक्षित खर्च वाढवणारा एखादा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. सोमवार ते गुरुवार अनुकूल दिवस आहेत. हाती घेतलेल्या कोणत्याही कामात यश लाभेल. परदेशी जाण्याचा काही पत्रव्यवहार करावयाला हा काळ उत्तम आहे. नोकरदारांना काही तरी लाभदायक वार्ता कळेल. नोकरीत इच्छेप्रमाणे बदल होईल, पैशाचे व्यवहार मात्र जपूनच करा. **महिलांस :** विवाहेच्छूंचे विवाह ठरतील. कलागुणांना प्रोत्साहन मिळेल.

**सिंह : अनुकूलता आहे**

चंद्र व आठवडा अखेरपर्यंत रवी अनुकूल आहेच. मंगळ तर राशीवरच आहे. त्यामुळे तुम्हाला नोकरी धंद्याच्या दृष्टीने जे काही करावयाचे असेल ते याच आठवड्यात करा. तुम्हाला सोमवार ते बुधवार एखादे अनुकूल स्वप्न पडेल. आर्थिक परिस्थिती सुधारणारे मार्ग सापडतील. उद्योग धंद्याचे मंदावलेले तंत्र सुरू होईल. चार मित्रांचे सहकार्य मिळेल. नवीन भांडवलाची सोय होईल. एका धनिक मित्राची मदत उपयोगी पडेल. दूरच्या नातेवाईकाचे घरी अनपेक्षित आगमन होईल व तुम्हाला आनंद होईल. तुम्ही नोकरीत कायम नसल्यास कायम व्हाल. वरिष्ठ तुम्हाला सहानुभूतीने वागवतील. बेकारांना काम मिळेल. नोकरीत बढती बदलीची शक्यता निर्माण होईल. तब्येतीला मात्र जपा. **महिलांस :** तुमच्या अपेक्षा पुऱ्या होतील. नोकरीत काही मनासारखे घडेल.

**कन्या : तब्येतीला उत्साह**

बाराव्या मंगळाचा क्रूर ससेमिरा तुमच्या पाठीमागे लागला आहे. त्यामुळे तुमच्यासारख्या बुद्धीवादी व भावनावश व्यक्तीचे मन अक्षरश: होरपळून निघत आहे पण आता फारच थोडा काळ ही स्थिती राहील तुमची नाजूक बनलेली तब्येत याच आठवड्यापासून सुधारू लागेल. उत्साह थोड्या फार प्रमाणात का होईना सचारू लागेल. मन निराश झाले होते ते आता आशावादी बनेल. इतर बाततीत लिहावयाचे तर नोकरीत वरिष्ठांची तुम्हाला अनपेक्षित अशी सहानुभूती मिळेल. वरिष्ठाना तुमची खरी ओळख याच वेळी होईल. तुमच्या मनाला समाधान मिळेल. स्वतंत्र अशा कोणत्याच धद्यास सध्या हात घालू नका. **महिलांस :** तुमच्या मनात पतिराजाबद्दल घर करून बसलेली काळजी मात्र आता कमी होऊ लागेल. निराशा कमी होईल.

**तूळ : नोकरीत प्रमोशन**

रवी-मंगळाच्या सामर्थ्यशाली दुकलीचा तुम्हाला एवढा मोठा आशीर्वाद सध्या लाभला आहे की खरोखर तुम्हाला कोणत्याही प्रकारच्या कुरकुरीला जध्या तरी सधी मिळण्यासारखी नाही. प्रामुख्याने हा आठवडा नोकरी करणाऱ्या आणि नोकरी मिळवू इच्छिणाऱ्या व्यक्तीना भाग्यकारक ठरावा. प्रयत्न आणि परिश्रम असा दुहेरी त्रास करून देखील आजवर नोकरीत काहीही तुमच्या मनासारखे घडत नव्हते ते या वेळी अनपेक्षित घडणार आहे. बढती, प्रमोशन, पगारवाढ, आवडत्या कामावर बदली असे काही तरी असेल. ज्या बेकाराना इटरव्ह्यू होऊन देखील कॉलच येत नव्हता त्याना 'ताबडतोब नोकरीवर हजर व्हा' असा हुकूम येईल. वणवण सपेल. राजकारणात संधी मिळेल **महिलांस** नको नको म्हणत असताना नोकरी पाठीमागे चालून येईल. आर्थिक स्थिती सुधारेल

**वृश्चिक : मदत मिळेल**

शनी आठवा असेपर्यंत तुमची तब्बेत थोडी फार कुरकुरतच राहील पण त्यामुळे तुम्ही घाबरून जावे अगर सारखी काळजी करीत बसावे असे मात्र नाही त्याचबरोबर हा आठवा शनी तुमच्या आर्थिक परिस्थितीला स्वयपूर्ण बनण्याजा प्रयत्न करणार आहे. तुम्ही रेसचे अगर लॉटरीचे नादी असाल तर मात्र ते प्रयत्न सोडू नका सर्वसाधारणपणे हा आठवडा गेल्या आठवड्यापेक्षा प्रगतीचा व सुधारणेचा आहे नोकरी व्यवस्थित चालेल. कामाचा ताप जरी कमी झाला नाही तरी उत्साह राहील वरिष्ठ वर्ग तुमच्या बरोबर जमवून घेईल. फारसा सतावणार नाही. स्वतंत्र उद्योग असल्यास त्याला मदत मिळेल. त्यासाठी भाडवल मिळू शकेल व्यापारी वर्गाने मात्र कोणतेही धाडस करणे टाळावे **महिलांस :** नोकरीत ठीक. आर्थिक आघाडी उत्तम हौसेसाठी पैसा मात्र उधळू नका.

**धनू : दुय्यम व्यवसायाला गती**

सातव्या शनीमुळे तुमच्या कौटुबिक स्वास्थ्याला सारखे धक्के बसत आहेत. पण तुमच्या काळजीचा कालखड आता निश्चित सपलेला आहे. नोकरीवर काही प्रतिकूल परिणाम होईल असे जे तुम्हाला अकारण वा सकारण वाटत आहे हे वाटणे मनातून साफसाफ काढून टाका. तुमच्या बाबतीत अशी परिस्थिती निर्माण होणार नाही. मला एक प्रेमाची सूचना द्यावीशी वाटते की कोणत्याही प्रकारच्या कामाबद्दल कटाळा करू नका. वरिष्ठाशी जुळवून घ्या. नोकरीच्या बाबतीत एवढे पथ्य अवश्य पाळा. तुमचा दुय्यम व्यवसाय अजिबातच थाबला होता. त्याला या आठवड्यात चालना मिळेल. जर तुम्ही मोठे उद्योगपती असाल तर तुमचा फायदा होईल. **महिलांस** . प्रसूतियोग्य स्त्रियानी थोडीफार काळजी घ्यावी नोकरीत ठीक.

**मकर : प्रवासाची दगदग**

तुमच्या अगी परमेश्वराने अगम्य अशी सहनशक्ती दिलेली आहे. त्याच्या जोरावरच तुम्ही वाटेल त्या प्रकारचे आघात सहन केले. आता तसे हाल होणार नाहीत व तुमच्या सहनशक्तीची कसोटी लागणार नाही मात्र या आठवड्यापुरता तरी आवश्यकतेशिवाय प्रवास करू नका. कारण या वेळी तुमचा कोणताही प्रवास पुरा होण्याची शक्यता वाटत नाही. कुठे वाहनच बिघडेल तर कुठे लहानसा अपघात घडणारच नाही असे नाही. म्हणून कुठेच न जावे हे उत्तम. पैसा कमी पडणार नाही पण खर्च जपून करा. तुमच्या प्रतिष्ठेला तडा जाण्यासारखे काही घडणार नाही. बेकाराना नोकरी अगर उद्योग मिळेल. तुम्ही ईश्वरी उपासना करा. **महिलांस :** तीर्थयात्रा करायचा बेत पुढे ढकला. नोकरीत बदलीची शक्यता.

**कुंभ : संसारात थोडा त्रास**

तुमचे सप्तम स्थान सध्या 'नादुरुस्त' आहे. आठवड्यातील पहिले चार दिवस चद्रदेखील प्रतिकूल आहे. म्हणून सागावेसे वाटते की, पती-पत्नी म्हणून तुम्ही उभयतानी एकमेकाला साभाळून घेऊन वागावे. आपल्याबद्दल गैरसमज होऊ देऊ नका. नवा ससार थाटला असेल तर कुणाच्या निंदेला वा कुणाच्या स्तुतीला बळी पडू नका. एरवी सर्वसाधारण बाजूनी हा आठवडा थोडाफार बरा आहे. नोकरीत थोडा त्रास मागे झाला असला तर तो मनातून काढून टाका. प्रवासाचा योग आहे. सोमवार ते गुरुवार कोणत्याही कामात यश. **महिलांस :** नोकरीत ठीक चालेल. गरजेपुरता पैसा मिळेल. उद्योगात गती राहील मन शात ठेवा.

**मीन : लेखनात त्रास**

तुम्ही गुरुच्या धर्माचे आहात. तुमचा उपासनेवर भर आहे. चिंतन, मनन तुमच्याकडून होत असते. बारावा गुरू जरी प्रतिकूल असला तरी तुम्ही आपल्या इष्टदेवतेची वा कुलदेवतेची उपासना करीत जा. त्यामुळे तुमची मनस्थिती सुधारेल. या आठवड्यात तुमच्या जागेचा प्रश्न शनिवार ते बुधवार या दरम्यान सुटेल. ज्याना बगला हवा त्याना तो मिळेल ज्यांना साधी खोली हवी त्याना ती मिळेल. नोकरीत तसे वाईट नाही. पण वरिष्ठांबरोबर मतभेद दर्शवू नका. तुम्ही लेखक असाल तर टीकात्मक लेखन टाळा. कुणावर वैयक्तिक टीका करू नका. आर्थिक दृष्ट्या तसा आठवडा वाईट नाही. **महिलांस :** प्रेम वा विवाह याबाबतीत गुडघ्याला बाशिंग नको. नोकरीत उत्तम. □


फुकट फुकट फुकट

**पांढरे डाग**

गौतम औषधाने जवळजवळ ३० वर्षे पाढरे डागाचे रोग्याना ६ दिवसात फायदा देऊन प्रसिद्धी मिळविली आहे. एक पॉकेट औषध फुकट मागवून फायदा मिळवा.

**गौतम आयुर्वेद भवन (SD-2)**

# चकनाचूर

भाऊ पाध्ये

## एकूण हेमा आहे – अगदीच अंधार नाही....

फिल्मी दुनियेतले दिवस मोठे ' डल ' चालले होते. सारे फिल्मी दुनियेमधले हिरो-हिरॉयनी घासलेटच्या लायनीमध्ये उभे आहेत काय ? असे वाटू लागले होते. इतक्यात एक दिवस एका ' इव्हिनिंग न्यूज 'मध्ये बातमी झळकली, ' हेमा–जितेंद्र लवकरच लग्न करणार ! ' सुप्रसिद्ध लेखक आणि फिल्मी पत्रकार बनी रूबेन यांनीच ही बातमी दिली होती. बनीसाहेब हे कधी फेकाफेकी करणारे नाहीत. रिस्पॉन्सिबल पत्रकार आहेत ते. अमक्या फिल्मी-स्टारचे अमक्या हिरोशी लफडे चालू आहे, असली ' गप-सप ' ते ठोकणार नाहीत याची मला खात्री होती. त्यात त्यांनी त्या वृत्तामध्ये लिहिलेच होते की, ' मी टेलिफोनवर हेमाशी बोललोच आणि हेमाने माझ्याजवळ आपले लग्न जमल्याची कबुली दिली. '

माझा या वृत्तावर विश्वास बसला. निदान बनी रूबेन यांनीच हे वृत्त दिल्यामुळे माझा त्या वृत्तावर विश्वास बसला. हेमाचे लग्न ! ते कुणाशी होणार हा मतलबाचा पॉईंट नव्हता. पण हेमाचे लग्न होणार ही बातमी ऐकून आपण साफ खतम झालो. तितकी एक आठवड्यापूर्वी वहिदाचे लग्न ठरल्याची बातमी ऐकून खतम झालो नव्हतो. कारण एकदा का हेमाने लग्न केलं म्हणजे तीसुद्धा राखी, मुमताझ, तनुजा, डिंपल यांच्याप्रमाणे घरीच बसणार हे निश्चित होते. आज फिल्मी जगात ही एकमेव तारका चमकत होती. आणखी काही दिवस ती चमकेल असाही भरंवसा वाटत होता. पण ती अशी अचानक शादी करून गेली म्हणजे फिल्मी जगात सगळी अमावास्याच.

तारका नाही अशा फिल्मी-इंडस्ट्रीची मी कल्पना करू शकत नाही. पूर्वी वॉल्टेअरने असं म्हटलं होतं म्हणे की, ' जर देव नसेल तर आपण एक नवीन तयार करू. ' त्याचप्रमाणे ' तारका नसेल तर आम्हाला एक-दोन तयार कराव्या लागतील. ' तारका शिवाय आम्ही जगू शकत नाही. तारका शिवाय आम्हाला सौंदर्य म्हणजे काय असते, ' चार्म ' कशात असतो तो ठाऊक नाही. आम्ही आमच्या सभोवार पाहिले तर आम्हाला कुठेही सौंदर्य दिसत नाही. आमच्या बायका, वहिणी किंवा मैत्रिणी यांच्यापैकी कुणालाच सुंदर म्हणता येणार नाही. त्यांनाही तसंच आमच्याविषयी वाटतं. आम्हीही काही सुंदर नाही. हिरो नाही. आमचा थोबडा पाहून त्या बोअर झालेल्या असतात. म्हणूनच त्याही राजेश खन्नाच्या पिक्चरला जातात. राजेश खन्ना नाहीतर धर्मेंद्र हाच त्यांचा मनके मनचा प्रियकर असतो. म्हणूनच जेव्हा पडद्यावर राजेश खन्ना आपल्या हिरॉइनला विचारतो, ' फिर कब मिलोगे ? ' त्या वेळी, हिरॉइन याचा जबाब देतात, ' जब तुम कहोगे. ' आमचं हेमा मालिनीसारख्या तारकेवरचं प्रेम किंवा आमच्या बायको-वहिणीचं राजेश खन्नावरील प्रेम हे असंच चालू रहाणार. आमच्या बायका आणि वहिणी भाग्यवान आहेत. राजेश खन्नाने डिंपलशी लग्न केलं किंवा धर्मेंद्रचे लग्न झालेलं असलं तरी त्यांचं काही विघडत नाही. म्हणजे आमच्या हिरॉइन्सची गोष्ट वेगळी. त्यांचं लग्न होतं आणि त्या चक्क घरी बसतात. मग आम्हाला त्यांना जबरदस्तीने विसरावंच लागतं.

आम्ही आता मुमुला विसरलो आहोत, राखीला विसरलो आहोत. राहिली होती फक्त हेमा. तिलाही विसरायचं ?

हेमाचे लग्न ठरल्याची बातमी ऐकताच आपण इतके अपसेट झालो होतो की, आपल्याला तर एक सबंध दिवस काहीच सुचले नाही. इकडे हेमाचे लग्न ठरल्याची बातमी आली आणि त्याच दिवशी वहिदाने लग्नही करून टाकले होते. वास्तविक आपण वहिदाचे फॅन. पण हेमा जाणार–सबंध फिल्म इंडस्ट्रीमध्ये एक अंधारी रात्र सुरू होणार ही बातमी ऐकल्यावर आपण इतके अपसेट झालो होतो की, त्यापुढे वहिदाच्या



देवबरोबर पडद्यावर होणाऱ्या आपल्या शादीमुळे हेमाची करमणूक तर होत नाही ना ?

हेमा मालिनी 'अमीर-गरीब'मध्ये देव आनंद बरोबर

लग्नाचा आपल्याला काहीच धक्का बसला नव्हता.

दुसरे दिवशी वर्तमानपत्र उघडले तर हेमा आणि जितेंद्रने लग्न ठरल्याच्या बातमीचा केलेला इन्कार वाचायला मिळाला. बरं वाटलं. एकूण हेमा आहे—अद्याप काही सिने सृष्टीत अंधार सुरू झाला नाही, हे ऐकून बरं वाटलं.

वाईट वाटलं ते बनी रुबेन यांच्याविषयी. ते एकदम खोट्यातच पडले. त्यांनी ही बातमी अशीच फेकून दिली होती का ?—मग ते टेलिफोनवर वगैरे बोलले असे जे आपण ऐकलं ते खरं की खोटं ?

आता याच्याविषयी काहीच खरं खोटं करण्यासारखं नाही. करता येतील ते फक्त अंदाज तर्क. या साऱ्या प्रकरणात दोन तीन घटना महत्वाच्या आहेत. एक म्हणजे यापूर्वी हेमाचे आणि संजीवचे सूत जुळत आलं होतं, ते का बिनसले ? दुसरं म्हणजे जितेंद्रचे शोभा सिप्पीशी लग्न ठरल्यासारखेच आहे. पण या प्रकरणाचा एकदाचा सोक्षमोक्ष लागत नाही. तिसरं म्हणजे मुमताझवर जितेंद्र मरत होता. मुमताझचे लग्न झाल्यानंतर जितेंद्रने जी दारू प्यायला (त्यापूर्वीही तो पीतच होता !) सुरुवात केली होती, त्याला काही मर्यादा ? संजीवकुमारशी म्हणे हेमा लग्न करायला तयार होती. पण संजीवकुमार आणखी काही वर्ष थांबेल आणि हेमा आणखी काही वर्ष सिनेमात काम करून चांगले कमावील तोपर्यंत धीर धरेल तर. संजीवकुमारला तावडतोब शादी उरकायची होती. हेमा त्याला राजी नव्हती. मग त्यात संजीवची लफडीही मध्ये आली. एकदा हेमाने संजीवला चक्कच विचारले, 'तुझी काही इतर बायकांशी लफडी आहेत.' संजीवने जबाब दिला. 'हो. काय करणार ?' तर जितेंद्रचे मुमुशी झालेले प्रकरण जगजाहीर असताना आणि शोभा सिप्पीशी त्याचे लग्न ठरल्यासारखेच असताना, आणि शिवाय अगदी पुढील महिन्यातच हे लग्न व्हायचे म्हणजे हेमाचे कमावणे दूर रहाण्याची शक्यता असताना, हे लग्न कसे होईल ?

जितेंद्रच्या निकटवर्तीयांकडून मला असे कळले की जितेंद्रचे वडील जितेंद्रच्या लग्नाबद्दल फारच उत्सुक आहेत. मुमुचे लग्न झाल्यानतर, जितेंद्र आता नीटपणे वळणावर यावा, यासाठी मुमुच्या तोडीस तोड खुबसूरत हिंदु मुलगी ते शोधताहेत. आणि हेमा ही अशी एकच तशी मुलगी आहे. जितेंद्रचे आईवडील हेमाकडे मद्राससारख्या दूरवर ठिकाणी नुसते चहा पिण्यास गेले असावेत याची शक्यता नाही. त्या चहापाण्याच्या कार्यक्रमाविषयी निश्चित काहीतरी बोलणी झाली असावीत.

हेमाचे लग्न ठरल्याची बातमी जाहीर झाली आणि दुसरे दिवशी इन्कारही जाहीर झाला. त्यानतर हेमाला कुठल्याही अखबारवाल्यास भेटणे अशक्य झाले आहे. हेमाने खर म्हणजे आता मुबईस येऊन वार्ताहरांशी बोलावं. वाडेकर स्टाईलने या प्रकरणावर पडदा टाकून लडनच्या दौऱ्यावर जाऊ नये. ते अधिकच fishy वाटू लागतं मग. ◻

## वहिदाचा वैताग

दरम्यान वहिदाने लग्न करून टाकले. आता वहिदा लग्नाच्या फंदात कधी पडेल असं वाटतच नव्हतं. आता पुन्हा तिन नृत्याकडे वळायच ठरवलही होत. पण बहुधा तो अखबारवाल्याना सागण्याचा बहाणाच ठरला. खरे म्हणजे तिला लग्न करायचेच होते आणि हिरो म्हणून अयशस्वी झालेल्या कमलजितशी तिने लग्नाची बोलणी चालू ठेवली असतील.

वहिदाने कमलजितशी लग्न करण्यापेक्षा तिचा भारत सोडण्याचा विचार फारच पक्का असावा. वहिदा ही एरव्हीच अत्यत touchy बाई आहे. आणि फरिदीशी बिनसलेल्या लग्नानतर, ती एरव्ही अखबारवाल्यासमोर आपल्याला त्याच काहीच नाही अशारितीने पेश करीत असली, तरी तिच्या मनातील सल तिला छळत असणारच. म्हणूनच तिने 'हा देश नको' असे मनातल्या मनात ठरवले असणारच. एका आमच्या अखबारवाल्याने अगदी योग्य कॉमेंट केली वहिदाच्या लग्नाची बातमी वाचून, 'वैतागलेली होती!' ◻

## महंमुद का झमेला

हल्ली महंमुद पंचवीस चित्रामधून एकाधवेळीच दिसतो. आणि बहुधा त्याची भूमिका पाहुणा कलाकाराची असते. एरव्ही आमचा प्रक्षक डोक्याला ताप न आणण्यासाठी पिक्चर्स पाहाण्यासाठी जातात. पण कॉमेडी मात्र हुटकून पाडतात. त्यामुळेच जॉनी वॉकर, महमुद, देवेन वर्मा यासारख्या हसवण्याचा धदा करणारी माणस दिवसेदिवस पडद्यावर कमी दिसतात आणि राममोहन, तिवारी वगैरे घाणेरडे चेहेरे असलेली माणसे वारवार पहावी लागतात. 'दुनिया का मेला' मध्ये महमुद पुन्हा दिसणार आहे. हा पाहुणा कलाकाराचा रोल नाही. महमुद म्हणतो की 'रोल चागला आहे' तो रेखाच्या– म्हणजेच हिरोईनच्या बापाची भूमिका करतोय. ही भूमिका करताना महमुदने जुना कॉमेडीयन चार्ली याला डोळयासमोर ठेवला आहे. महमुदला कॉमेडीयन म्हणून आपण मानतोच. पण चार्लीला त्याच्यापेक्षाही मानतो. महमुदला चार्ली झेपतो आहे का 'दुनिया का मेला' हे नुसताच महंमुद का झमेला ठरणार आहे, हे आता पाहायचे आहे. ■ ■

## सप्रेम नमस्कार : पृष्ठ ४ वरून

तिला व्यवहाराचा पाया पाहिजे, आणि 'आधी केले मग सागितले' अशी पुण्याई पाहिजे. पण या दोन्हींचीही (इतर सर्व वस्तूप्रमाणे!) टचाई, किंबहुना अलभ्यता आपल्या देशात असल्यामुळेच सध्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. जनतेने आदेश मानावा असे प्रभावी सामर्थ्य कोणाच्याही शब्दात राहिले नाही.

जी व्रते जनतेसाठी सागितली आहेत त्यातून साहित्यिक अपवाद म्हणून वगळले जावेत काय? त्यागाचा मक्ता फक्त सामान्य जनानीच घ्यावा असे सत्ताधाऱ्यांप्रमाणे साहित्यिकानाही वाटते काय? 'मुक्त व स्वैर जीवनानुभूतीशिवाय साहित्य जिवत होणार नाही.' हीच सबब पुढे करून हे लोक सर्वच बधनातून सुटू पाहातात की नाही? आम्ही सामान्यजनानी हे किती दिवस सहन करावे? स्वातत्र्यपूर्व काळात पूर्वनियोजित कार्यक्रमाची सबब सागून सत्याग्रहात भाग घेण्याचे सत्याग्रही टाळीत होते काय?

रवीद्रनाथानी इंग्रज सरकारच्या निषेधार्थ आपली 'सर' ही पदवी परत केली. स्वकीय सरकारचा निषेध म्हणून आमचे साहित्यिक आपल्या पदव्या, आणि सरकारी पुरस्काराच्या रकमा परत करतील काय? निदान ती रक्कम बिहारकडे पाठवतील काय?

येऊन जाऊन सर्वांचा डोळा काय तो लग्नातील जेवणावळीवर. अन्नधान्याच्या किंमती ७०–८० टक्क्यानी जोपर्यंत उतरत नाहीत तोवर त्याच्यावर बहिष्कार घालावा म्हणे! (त्या सत्तर-ऐंशी टक्क्यानी उतरणे कधी तरी शक्य आहे काय?) सामान्यजनाच्या आयुष्यात लग्न हे एकदाच होते; आणि सध्याच्या काळात सर्व नातेवाईकानी एकत्र जमून आनदाने गोडधोड खाण्याचा हा प्रसग वर्षानुवर्षात केव्हातरी येतो. (लक्ष भोजनाची गोष्ट सोडा!) गेली ३२–३३ वर्षे ४२ ची चळवळ, बगालचा दुष्काळ, देशाची फाळणी कत्तली, महापूर, भूकंप, धरणफुटी, युद्धे, देशात कुठे ना कुठे होतच राहणारे अवर्षण, यासारख्या घटना अखडितपणे घडतच आहेत मग सामान्यजनानी कायमचे सुतकी जीवनच आमरण कठावे काय? त्याना कधीच चैन करता येऊ नये का?

बहिष्कार घालायचा तो नुसत्या लग्नाच्याच जेवणावळीवर काय म्हणून? सर्वच प्रकारच्या मेजवान्या बद पाडा! नाटकाचे व चित्रपटाचे मुहूर्त, रौप्यमहोत्सव, सर्व प्रकारच्या परिषदा, पुस्तकाचे प्रकाशनसमारभ, समेलने, कोणत्याही निमित्ताने मिष्टान्नाची चैन होता कामा नये! फार कशाला? येते साहित्यसमेलन जरी सुवर्ण महोत्सवी असले तरी त्या ठिकाणी मिलोची भाकरी आणि रेशनच्या तांदुळाचा भात यांच्याव्यतिरिक्त काहीही देता कामा नये. स्वत अध्यक्षानीच हा आग्रह धरावा आणि स्वतःच आदर्श घालून द्यावा! अधिकार तैसा करू उपदेश हेच खरे!

डॉ. नलिनी बापट, पुणे

यापुढच्या १५ ऑगस्ट अंकात.....

# प्लासीचा रणसंग्राम
# आणि
# अनाथ पांडुरंग

- ☐ ब्रिटिशांच्या आगमनापूर्वीच्या समाजस्थितीचे चित्रण करणाऱ्या, त्यावेळच्या इंग्रज अधिकाऱ्यांनी लिहिलेल्या दोन दुर्मिळ कादंबऱ्यातील काही नमुना प्रकरणे.
  सादरकर्ते : दि. वा. मोकाशी
  पां. रा. ढमढेरे
- ☐ 'रोझेस इन डिसेंबर' या चालू लेखमालेचा शेवटचा लेखांक
- ☐ मुंबई ( भ्रष्टाचार ) विद्यापीठासंबंधीचा तिसरा स्फोटलेख
- ☐ शिवाय नेहमीची वाचनीय सदरे

किंमतही नेहमीची. एक रुपया
पृष्ठसंख्या मात्र नेहमीपेक्षा थोडी अधिक.
वरील १५ ऑगस्ट अंकानंतर सुरू होत आहेत...

- ☐ केळचाच्या मळचातील स्वामी महाराज
- ☐ बेलंदरचा सैतान

–केनेथ अँडरसनच्या जगप्रसिद्ध शिकारकथाचे अनुवाद...
आणि पाठोपाठ
'नाझी भस्मासुराचा उदयास्त' या सुप्रसिद्ध ग्रंथाचे लेखक
रा. म. शास्त्री यांची आणखी एका भस्मासुराच्या उदयास्ताची कहाणी

प्रत्येक अंक वाचनीय, भरीव आणि चौफेर
प्रबोधन आणि मनोरंजनाचा नित्यनवा मेळ

# सा प्ता हि क   मा णू स

राजहस प्रकाशन सस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक सस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण १०२५ [illegible] पेठ, पुणे येथील सस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर